www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118

दैनिक
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ | ■ वर्ष - ०२ ■ अंक १२० ■ पृष्ठे - ०६ ■ ठाणे, शनिवार, २१ सप्टेंबर २०२४ ■ रु. २/- | ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### मुंबईचे माजी पोलिस आयुक्त संजय पांडे काँग्रेसमध्ये; 'या' मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची शक्यता

● मुंबई, सम्यक कासारे :

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला असून ते वर्सोव्यातून महाविकास आघाडी तर्फे निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे यांनी दीड महिन्यांपूर्वी झुलेलाल मंदिरात पूजा करतानाचा एक फोटो फेसबुकवर पोस्ट करत विधानसभा निवडणूक लढवण्याचे संकेत दिले होते. परंतु त्यांनी कोणताही पक्ष जाहीर केला नव्हता. गुरुवारी त्यांनी मुंबईमध्ये काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्याबद्दल त्यांना महाविकास आघाडी तर्फे वर्सोव्यातून विधानसभेचे तिकीट दिल जाऊ शकतं. ते फोन टॅपिंग प्रकरणामुळे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे चर्चेत आले होते. संजय पांडे 1986 च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. त्यांनी आयआयटी कानपूरमधून शिक्षण घेतलं. पांडेंनी मुंबईचे पोलीस आयुक्तपदही भूषवले आहे. पांडे अनेकदा वादात अडकले असून सप्टेंबर 2022 मध्ये त्यांना नॅशनल स्टॉक एक्स्चेंजच्या कर्मचाऱ्यांशी संबंधित फोन टॅपिंग प्रकरणात अटक झाली होती.

### महारेराच्या अध्यक्षपदी मनोज सैनिक यांची नियुक्ती



● मुंबई, विशाल कारंडे :

राज्याचे माजी मुख्य सचिव आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सल्लागार मनोज सैनिक यांची महारेराच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना 2021 मध्ये महारेराच्या अध्यक्षपदी अजय मेहता यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ 20 सप्टेंबर 2024 रोजी समाप्त झाला अजय मेहतांच्या जागी मनोज सैनिक यांना महारेराच्या अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

# मुंबई उच्चन्यायालय म्हणतं, IT कायद्यातील घटना दुरुस्ती असंविधानिक !

## केंद्र सरकारला आदेश देत IT नियमांमधील 2023 च्या दुरुस्त्या केल्या रद्द



● मुंबई, यश सावंत :

मुंबई उच्च न्यायालयाचा केंद्र सरकारला दणका दिला आहे. न्यायालयाने आयटी कायद्यातील घटना दुरूस्ती असंविधानिक असल्याचं म्हणत ती रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला मोठा झटका दिला आहे. न्यायालयाने शुक्रवारी माहिती तंत्रज्ञान सुधारणा नियम 2023 रद्द केला आहे. या दुरुस्ती अंतर्गत, केंद्र सरकारला सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर स्वतःबद्दल बनावट आणि दिशाभूल करणारी माहिती देणाऱ्यांना ओळखण्यासाठी फॅक्ट चेक युनिट (FCU) स्थापन करण्याचा अधिकार होता. कॉमेडियन कुणाल कामरा याच्यासह काही मीडिया कंपन्यांकडून आयटी कायद्यातील दुरूस्तीला न्यायालयात आव्हान देण्यात आलं होतं. त्यानंतर शुक्रवारी न्यायालयाने आयटी कायद्यातील घटना दुरूस्ती असंविधानिक असल्यानं म्हणत ती रद्द केली आहे.

पान २ वर

## चोरीच्या उद्देशाने बेस्टच्या कंडक्टरवर चाकूने केला हल्ला

● मुंबई, सचिन कदम :

यात कंडक्टर गंभीर जखमी झाले



मुंबईत चोरीच्या उद्देशाने एका चोराने बेस्टच्या कंडक्टरवर हल्ला केला आहे. चोराने कंडक्टरला भोसकले असून पळून गेला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी शहबाझ खानला अटक केली आहे. पण या घटनेमुळे बेस्टचे कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बेस्टमध्ये काम करणाले अशोक डांगळे हे कामावर होते. डांगळे सात क्रमांकाच्या बसमध्ये कार्यरत असताना धारावीच्या पिला बंगलो स्टॉपवर शहबाझ खानने डांगळे यांना लुटण्याचा प्रयत्न केला. तेव्हा डांगळे यांनी खानला विरोध केला. तेव्हा खानने चाकूने डांगळे यांना भोसकलं. डांगळे यात गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णायलयात दाखल केले. पण त्यांची प्रकृती खालावल्यानंतर त्यांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले.

## तिरूपतीच्या प्रसादात चरबी आढळल्याचे प्रकरणावर देवस्थानचे सदस्य मिलिंद नार्वेकर म्हणतात..



● मुंबई, विशाल पाटील :

भारतातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेले तिरुपती मंदिराच्या प्रसादामध्ये फिश ऑईल असल्याचे सिद्ध झाले आहेत. आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी तिरुपती मंदिरातील प्रसादामध्ये तूपाऐवजी प्राण्यांचा चरबीचा वापर केला जात असल्याचा आरोप लावला होता. त्यानंतर प्रसादाचा नमुना हा तपासणीसाठी पाठविण्यात आला होता.

पान २ वर

## मोटार वाहन विभाग कर्मचारी मंगळवारपासून बेमुदत संपावर जाणार

### कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामकाज व ग्राहकसेवा या दुहेरी कामांच्या बोजामुळे कर्मचारी त्रस्त

● कल्याण, आकाश कांबळे :




अनेक वर्षाच्या आपल्या प्रलंबित विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे ६६ वर्ष नेतृत्व करणाऱ्या मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेने मंगळवारपासून (ता.२४) बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. बेमुदत संपावर जाण्याची नोटीस परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांना मोटार वाहन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, सरचिटणीस सुरेंद्र सरतापे, पवबा कणखर, दीपक गांगुर्डे यांनी दिली. परिवहन आयुक्तांनी तातडीने सहकारी अधिकाऱ्यांसह कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींबरोबर गुरूवारी चर्चा केली. या चर्चेत नेहमीप्रमाणे कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींना कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षाच्या प्रलंबित मागण्यांवर अधिकाऱ्यांनी पोकळ आश्वासने दिली. बेमुदत संप मागे घेण्याची गळ घातली. लिखित स्वरुपात आश्वासनांची पूर्तता करण्यास अधिकारी असमर्थ ठरले.

पान २ वर

## खासगी क्लासने आधीच प्रसिद्ध केलाला निबंध युपीएससीच्या पूर्व परीक्षेत जसाच्या तसा आल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम

● पुणे, अभिजीत येरल्लू :




पुण्यात केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात युपीएससी परीक्षेचा पेपर फुटल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. खासगी क्लासेसमधील विद्यार्थ्यांना पेपर आधीच मिळाला होता, असा आरोप करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या आरोपामुळे युपीएससीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहेत. युपीएससीच्या नागरी सेवांसाठीच्या मुख्य परीक्षेतील निबंध आधीच प्रसिद्ध झाल्याचा आरोप पुण्यातील विद्यार्थ्यांनी केला आहे. 'देअर इज नो पाथ टु हॅपिनेस, हॅपिनेस इज द पाथ...' हा निंबध खासगी क्लासने आधीच प्रसिद्ध केला होता. हाच निंबधाचा विषय युपीएससीच्या पूर्व परीक्षेत जसाच्या तसा आला, अशा आरोप विद्यार्थ्यांनी केल आहे.

पान २ वर

## निवेदन देऊन समस्या सुटत नसल्याने शिवसेना शिंदे गटाच्या नेत्याने केडीएमसीच्या आय- प्रभागावर हंडा मोर्चा काढला



● कल्याण, विवेक गुंजाळ :

कल्याण पूर्वेतील चिंचपाडा, नांदीवलीसह आजूबाजूच्या गावामध्ये नागरिकांना पाण्याची समस्या भेडसावत आहे. या पाणी टंचाईच्या समस्येबाबत निवेदन देऊन देखील समस्या सुटत नसल्याने शिवसेना शिंदे गटाचे महेश गायकवाड यांनी केडीएमसीच्या आय प्रभागावर हंडा मोर्चा काढत अधिकाऱ्याला चांगलेच धारेवर धरले. कल्याण पूर्वेतील चिंचपाडा, नांदीवली गावांसह आसपासच्या परिसरात नागरिक कमी दाबाने व अपूर्ण स्वरूपात होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे त्रस्त आहेत. पाणी टंचाईची समस्या भेडसावत असल्याने नागरिकांनी आंदोलने केली, निवेदने दिली, पाठपुरावा केला. मात्र पाणी समस्या सुटली नाही. यामुळे आज शिवसेना शिंदे गट शहर प्रमुख महेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी महिलांनी केडीएमसीच्या आय प्रभाग कार्यालयावर हंडा कळशी मोर्चा काढला. महेश गायकवाड यांनी अधिकाऱ्याला घेराव घालत पाण्याच्या समस्यांबाबत जाब विचारला.

## दहशतवादी संघटनांना अर्थसहाय्य व भ्रष्टाचार रोखण्यात भारताने केलेल्या प्रयत्नांबाबत 'फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स' ने केली स्तुती




● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

> आपण ही चाचणी उत्तम गुणांसह उत्तीर्ण झालो आहोत. एकाही मापदंडामध्ये भारताला कनिष्ठ मूल्यांकन मिळालेले नाही. एकतर सर्वोत्तम किवा मध्यम मूल्यांकन देण्यात आले आहे. – विवेक अग्रवाल, केंद्रीय वित्त सचिव

दहशतवादी संघटनांना अर्थसहाय्य आणि भ्रष्टाचार रोखण्यात भारताने केलेल्या प्रयत्नांची 'आर्थिक कृती गटा'ने (फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स – एफएटीएफ) स्तुती केली आहे. मात्र त्याच वेळी अशा प्रकरणांमध्ये खटल्यांची प्रक्रिया अधिक सशक्त करण्याची आवश्यकता संस्थेने गुरुवारी सादर केलेल्या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. तसेच जम्मू-काश्मीरमध्ये 'आयसिस', अल कायदाशी संबंधित अतिरेकी संघटना कार्यरत असल्याचा इशाराही 'एफएटीएफ'ने दिला आहे. गतवर्षी नोव्हेंबरमध्ये भारतातील विविध भागांत प्रत्यक्ष दौरे केल्यानंतर 'एफएटीएफ'ने हा ३६८ पानी अहवाल तयार केला आहे.

पान २ वर

## महिलेने विनयभंगाची धमकी दिल्याने जेष्ठ नागरिकाने लोकल ट्रेन खाली केली आत्महत्या



● मुंबई,राकेश गायकवाड :

उपनगरातील मुलुंड परिसरात एका ६७ वर्षीय जेष्ठ नागरिकाने आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. खुशाल दंड (वय 67) असे या व्यक्तीचे नाव आहे. इमारतीमधील पार्किंगवरुन झालेल्या भांडणातून विनयभंग केल्याचा खोटा गुन्हा दाखल करेन, अशी महिलेने धमकी दिल्याने खुशाल दंड यांनी लोकल ट्रेनखाली आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. ते आणि या प्रकरणातील आरोपी कुमकुम मिश्रा या मुलुंड पश्चिमेला असणाऱ्या मनीषा प्राईड इमारतीमध्ये राहतात. काही दिवसांपूर्वी या दोघांमध्ये पार्किंगवरुन वाद झाला होता. यात कुमकुमने दंड यांना मारहाण करीत धमकावले होते. तसेच दंड यांना मी पोलिसांत तुमच्याविरोधात विनयभंगाची तक्रार दाखल करेन, अशी धमकीही दिली होती. या घटनेनंतर खुशाल दंड प्रचंड अस्वस्थ झाले होते. याच ताणातून खुशाल दंड यांनी मुलुंड रेल्वे स्थानकाजवळ लोकल ट्रेनखाली आत्महत्या केली. याप्रकरणी दंड यांच्या पत्नीच्या तक्रारीवरून कुमकुम मिश्राच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा मुलुंड पोलिसांनी दाखल केला आहे. तसेच कुमकुम मिश्राला अटकही करण्यात आली होती. मात्र, त्यांची जामिनावर मुक्तता करण्यात आल्याची माहिती मुलुंड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय जोशी यांनी दिली.

पार्किंगसारख्या क्षुल्लक कारणावरून झालेले भांडण, त्यात महिलेने विनयभंग केल्याची दिलेली धमकी यामुळे धक्का बसलेल्या दंड यांनी आत्महत्या करून जीवन संपविले. यामुळे आता त्यांची पत्नी एकटी पडली आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वर्ध्यातील जाहीर सभेत कॉंग्रेस पक्षावर केला जोरदार प्रहार

● नाशिक, नितीन देवळेकर :



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी वर्धा येथे आयोजित जाहीर सभेत गणपतीच्या आरतीच्या मुद्दावरून कॉंग्रेस पक्षावर जोरदार प्रहार केला. नुकत्यात पार पडलेल्या गणेशोत्सवादरम्यान मोदी यांनी सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी जाऊन गणपतीची आरती केली होती. यावर कॉंग्रेस, शिवसेना ठाकरे गटाने आक्षेप घेत टीका केली होती. या टीकेवर पंतप्रधान मोदी यांनी प्रथमच उत्तर दिलं आहे. मोदी म्हणाले, 'मी गणपतीच्या दर्शनासाठी (सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीशांच्या घरी) गेलो असता कॉंग्रेसमधलं तुष्टिकरणाचं भूत जागं झालं. तुष्टिकरणासाठी कॉंग्रेस पक्ष काहीही करू शकतो. आता कॉंग्रेस पक्ष गणपतीच्या आरतीचाही द्वेष करू लागला आहे. स्वातंत्र्याच्या लढाईत लोकमान्य टिळक यांच्या नेतृत्वाखाली साजरा होणारा गणपती उत्सव हा भारताच्या एकात्मतेचा उत्सव बनला होता, या घटनेची ही महाराष्ट्राची भूमी साक्षिदार आहे. गणेशोत्सवात प्रत्येक धर्म आणि समाजाचे लोक एकत्र आले होते. त्यामुळेच कॉंग्रेसला गणपतीच्या आरतीची चीड येते' असं मोदी म्हणाले. कॉंग्रेस पक्षात आमची आस्था आणि संस्कृतीबाबत थोडा जरी सन्मान असता तरी त्यांनी गणपती आरतीचा विरोध केला नसता, असं मोदी म्हणाले.

कर्नाटकमध्ये कॉंग्रेस सरकारने गणपती बाप्पालाच कोठडीच डांबले होते, असा आरोप पंतप्रधान मोदी यांनी यावेळी केला. मोदी म्हणाले, 'कर्नाटकात गणपतीच्या ज्या मूर्तीची लोक पूजा करत होते, त्या मूर्तीला पोलीस व्हॅनमध्ये कैद करण्यात आले होते. इकडे महाराष्ट्रात गणपतीची आराधना सुरू असताना तिकडे कर्नाटकात मात्र गणेश मूर्ती पोलीस व्हॅनमध्ये होती. गणपतीच्या या अपमानामुळे देशभरात संताप आहे. याविषयाबाबत बोलण्यास कॉंग्रेसच्या मित्र पक्षांच्या तोंडावर जणू कुलुप लागलेले दिसते. त्यांच्यावर कॉंग्रेसच्या संगतीचा असा काही रंग चढलाय की गणपतीच्या अपमानाविरुद्ध बोलण्याची त्यांची हिंमत होत नाहीए. कॉंग्रेसच्या या पापांचे आम्हाला एकजुटीने उत्तर द्यावे लागणार आहे.

पान २ वर

## संपादकीय
संपादक - राकेश शंकर गोरे

# काश्मीरमध्ये शांतता ?

अनुच्छेद ३७० रद्द झाला, दहशतवाद्यांच्या कारवाया कमी झाल्या, रस्ते गजबजलेले, व्यवहार सुरळीत आहेत, म्हणून काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित झाली आहे, असे म्हणणे कितपत योग्य? सीमेपलीकडून रसदपुरवठा पुन्हा सुरू झाला तर काय ? निवडणुकीनंतर समीकरणे बदलतील का? 'आझादी'च्या ठिणगीला हवा दिली गेली तर काय होईल? या प्रश्नांची उत्तरे दिल्लीतील सत्ताधाऱ्यांना शोधावी लागतीलश्रीनगरमधील दल लेकच्या समोरील एका रेस्तारामध्ये लष्करी अधिकाऱ्याशी गप्पा मारत असताना आसपासची गजबज बघून काश्मीर खोऱ्यात खरोखरच शांतता निर्माण झाली आहे, असे वाटून गेले. शहरांमध्ये रात्री दुकाने हॉटेल्स उघडी होती. रस्त्यावर रहदारी होती.

कुठल्याही शहरामध्ये असते तसेच, सर्वसामान्य वातावरण होते. अनुच्छेद ३०० ठेवले किंवा काढून घेतले तरी काय फरक पडतो? इथे सगळेच सुरळीत असेल तर विनाकारण 'कश्मिरियत वर कशाला बोलायचे, असाही विचार मनात येऊन गेला. लोक म्हणत होते की, इथे आता पूर्वीसारखी दगडफेक होत नाही. काश्मिरी लोकांच्या बोलण्यावरून वाटले की, खोऱ्यातील असंतोषाचे दिवस संपुष्टात आले आहेत. आता फक्त विकासाच्या गोष्टी केल्या पाहिजेत! रेस्तराँमधील राजभोजन संपवून दुसऱ्या दिवशी श्रीनगरमधील निवासी कॉलनीमध्ये एका बुजुर्गाला भेटायला गेलो. शेख अब्दुल्ला फारुख अब्दुल्लांपासून काश्मीरमधील बहुसंख्य विभाजनवादी नेत्यांपर्यंत इंदिरा गांधी, मनमोहन सिंग, अटलबिहारी वाजपेयींपर्यंत दिल्लीतील अनेक नेत्यांमध्ये त्यांची उठबस होती व आहे. सोनमर्गमध्ये एक आंतरराष्ट्रीय दहशतवादी लपून बसल्याची माहिती याच व्यक्तीने तत्कालीन वाजपेयींच्या सरकारला दिली होती! त्यांच्या घराच्या हिरवळीवर गप्पा मारता मारता ते म्हणाले, काश्मीर आतून धगधगतंय. वरवर शांतता दिसत असली तरी लाव्हा कधी बाहेर पडेल सांगता येणार नाही. त्यांचे विधान आश्चर्यचकित करणारे होते. श्रीनगरच्या रस्त्यावर एक दगडदेखील फेकला जात नाही मग अशांतता कसली, असा प्रश्न मनात येऊन गेला.

हे गृहस्थ म्हणाले, माझ्या आसपास अनेक तरुणांकडे बंदुका आहेत. मी त्यांना ओळखतो, ते कधी इथे असतात, कधी नसतात. एका घराकडे बोट दाखवून ते म्हणाले की, त्या घरातील मुलगा आणि आई दोघेही दगडफेक करण्यात पुढे होते. आता शांत बसले असले तरी मुलाकडे बंदूक आहे. अशा बंदुका कधीही बाहेर निघू शकतात! मग, काश्मीर खोऱ्यात इतकी शांतता का दिसते आहे, असे एका अनुभवी पत्रकाराला विचारले. त्यांचे म्हणणे होते की, पाकिस्तानने 'पाण्याचा नळ बंद केला आहे, अंतर्गत असंतोष शमवण्यामध्येच त्यांची ताकद वाया जात असावी. ते नळ सुरू करतील तेव्हा दहशतवादी हल्ले होऊ लागतील.

या पत्रकाराची हयात काश्मीर गेली आहे, त्याची माहीतगारांची फळीही खोलवर रुजलेली आहे. त्यांचे म्हणणे होते की, जम्मू विभागात होत असलेले दहशतवादी हल्ले काश्मिरी तरुणांकडून होत नाहीत, त्यामागे प्रशिक्षित दहशतवादी आहेत. हीच माहिती अन्य एका स्रोताकडूनही मिळाली. गेले काही महिने जम्मू विभागातील राजौरी-पुंछच्या पहाडी भागांमध्ये दहतशवादी हल्ले होत आहेत. हा लेख लिहीत असतानाच काश्मीर खोऱ्यात बारामुल्लामध्ये दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली जात असल्याचे वृत्त आले. २०१९ नंतर काश्मीर खोऱ्यात तुलनेत कमी झालेले दहशतवादी हल्ले पुन्हा सुरू होण्याचा धोका तर नसेल, असा मनात विचार येऊन गेला. २०१६ मध्ये दहशतवादी बुऱ्हाण वाणीला लष्कराने ठार मारल्यानंतर काश्मीरमध्ये बंदुका हाती घेणाऱ्या तरुणांचा ओघ वाढला होता.



## आजची चित्रोळी

वाचेल कसा कोणी
होताच अवकृपेला !
पडताच वीज अंगीं
क्षणार्धी नष्ट झाला !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर,**
**विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### मोटार वाहन विभाग कर्मचारी मंगळवारपासून.....

त्यामुळे यापूर्वीप्रमाणेच परिवहन अधिकारी आपली बोळवण करत आहेत याची जाणीव झाल्याने मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेने मंगळवारपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला.

आरटीओ कार्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामकाजाबरोबर वाहन चालक, मालक हे ग्राहक सेवेचे काम करावे लागते. यामुळे प्रशासकीय कामात गुंतागुंत निर्माण झाली आहे. या दुहेरी कामांच्या बोजामुळे कर्मचारी त्रस्त आहेत. महसुली विभागीय बदल्यांचे धोरण रद्द करण्यात आले नाही. विभागीय परीक्षांमध्ये अनावश्यक बदल करण्यात आले आहेत. आकृतीबंधाची योग्य अंमलबजावणी केली जात नाही. कर्मचाऱ्यांच्या हिताच्या कळसकर समितीच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणे, बदल्या, बढत्यांमध्ये सेवा ज्येष्ठतेचा विचार न करणे. या कर्मचाऱ्यांच्या मागण्या आहेत. मोटार वाहन कर्मचारी संघटनेने वेळोवेळी या मागण्यांविषयी शासनाकडे दाद मागितली आहे. त्याची दखल शासनाने घेतली नाही. केवळ तोंडदेखली आश्वासने देऊन कर्मचाऱ्यांची वेळोवेळी बोळवण करण्यात आली. त्यामुळे यावेळी लेखी स्वरुपात मागण्या मान्य झाल्याचे पत्र परिवहन विभागाकडून दिले जात नाही, तोपर्यंत बेमुदत बंद मागे घेतला जाणार नाही, असे अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी सांगितले.

वाहनांशी संबंधित कामे आरटीओ कर्मचारी संपामुळे रखडणार असल्याने वाहन मालक अस्वस्थ आहेत. शिकाऊ वाहन प्रशिक्षणार्थी पदाची परीक्षा रद्द होण्या बरोबर वाहनांशी संबंधित सर्व कामे कर्मचारी संपामुळे रखडणार असल्याने वाहन मालकांची आरटीओ कार्यालयात कामे उरकून घेण्यासाठी शुक्रवारी झुंबड उडाली होती.

### खासगी क्लासने आधीच प्रसिद्ध केलाला निबंध...

खासगी क्लासने प्रसिद्ध केलेला निंबधाचा विषय जसाच्या तसा युपीएससीच्या परीक्षेत आल्याने पुण्यातील विद्यार्थ्यांमध्ये खळबळ माजली. निंबधाचा विषय १२५ मार्कांसाठी आहे.विद्यार्थ्यांनी या विरोधात पुण्याच्या जिल्हाधिकार्यांना निवेदन दिले आहे. युपीएससीच्या नागरी सेवांसाठीच्या पुर्व परीक्षेचा हा पेपर शुक्रवारी झाला. शुक्रवारचा निंबधाचा पेपप रद्द करण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली. खासगी क्लासचा निंबधाचा विषय युपीएससीच्या परीक्षेत कसा आला? याची चौकशी करण्याची मागणीही विद्यार्थ्यांनी केली.

### दहशतवादी संघटनांना अर्थसहाय्य व भ्रष्टाचार...

२६ ते २८ जून या काळात सिंगापूरमध्ये झालेल्या संस्थेच्या बैठकीत हा अहवाल स्वीकारण्यात आला होता. त्याचे तपशील गुरुवारी उघड करण्यात आले. त्यानुसार भारताला 'नियमित पाठपुरावा' (रेग्युलर फॉलो अप) या श्रेणीत ठेवण्यात आले असून जी-२० राष्ट्रसमूहातील भारतासह ब्रिटन, फ्रान्स आणि इटली हे केवळ चार देश या श्रेणीत आहेत. या श्रेणीमुळे भारताला तीन वर्षांनी कृती अहवाल सादर करायचा असला, तरी ते बंधनकारक नाही, तसेच यापुढील आढावा थेट २०३१ साली घेण्यात येणार आहे. अफरातफर विरोधी यंत्रणा (एएमएल) आणि दहशतवादी अर्थपुरवठा विरोधी यंत्रणा (सीएफटी) अनेक अंगांनी प्रभावीपणे राबविण्यात भारताला यश आल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. भारतामध्ये भ्रष्टाचाराचा मुख्य स्रोत देशांतर्गत असल्याचे यात म्हटले असून इस्लामिक स्टेट (आयसिस) आणि अल कायदा या दहशतवादी संबंधित संघटना जम्मू-काश्मीरमध्ये सक्रीय असल्याचेही 'एफएटीएफ'ने स्पष्ट केले आहे. दुसरीकडे भ्रष्टाचार आणि दहशतवादी अर्थसहाय्याच्या प्रकरणांमध्ये खटले चालण्याचे तसेच निकाली काढण्याचे प्रमाण कमी असून त्यात सुधारणा करण्याची गरज असल्याचे एफएटीएफने म्हटले आहे. केंद्रीय वित्तसचिव विवेक अग्रवाल यांनीही खटल्यांचा जलद गतीने निपटारा आवश्यक असल्याचे मान्य केले असून अन्य सर्व शिफारशी या पूरक स्वरुपाच्या असल्याचे म्हटले आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वर्ध्यातील जाहीर सभेत...

परंपरा, प्रगती, सन्मान आणि विकासच्या अजेंड्यासोबत आम्हाला उभं रहावं लागेल. आम्ही एकत्रित येऊनच महाराष्ट्राची अस्मिता वाचवून गौरव आणखी वाढवू आणि महाराष्ट्राच्या स्वप्न पूर्ण करू, असं मोदी यांनी यावेळी सांगितलं.कॉंग्रेस पक्ष हा देशातला सर्वात बेईमान आणि भ्रष्ट पक्ष असल्याचा आरोप मोदी यांनी सभेत केला.

### मुंबई उच्चन्यायालय म्हणतं, IT कायद्यातील घटना...

याप्रकरणी सुनावणी करताना न्यायमूर्ती अतुल चांदूरकर यांच्या खंडपीठाने सांगितले की, "माझ्या मते या सुधारणा भारतीय राज्यघटनेच्या कलम 14 आणि कलम 19 चे उल्लंघन करतात". जानेवारीत मुंबई उच्च न्यायालयानं दिलेल्या 'टायब्रेकर' निकालात न्यायमूर्ती अतुल चांदूरकर यांनी निवृत्त न्यायमूर्ती गौतम पटेल यांच्या निकालाशी सहमत असल्याचं स्पष्ट केलं आहे.

जानेवारीत यावर निकाल देताना उच्च न्यायालयाच्या खंडपीठातील दोन न्यायमूर्तींनी एकमेकांच्या विरोधात मत नोंदवलं होतं. निवृत्त न्यायमूर्ती गौतम पटेल यांनी याचिकाकर्त्यांच्या बाजूनं तर न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांनी केंद्र सरकारच्या बाजूनं निकाल दिल होता.

त्यामुळे प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी न्यायमूर्ती अतुल चांदूरकर यांच्या एकलपीठाकडे वर्ग करण्यात आलं होतं. आयटी कायद्यातील ही प्रस्तावित सुधारणा घटनाबाह्य घोषित करत आणि नव्या नियमांनुसार, कोणत्याही व्यक्तीवर कारवाई करण्यापासून केंद्र सरकारला रोखण्याचे आदेश देण्याची याचिकेतून मागणी केली होती.

दरम्यान, केंद्र सरकारने 6 एप्रिल 2023 रोजी माहिती तंत्रज्ञान (मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे आणि डिजिटल मीडिया आचारसंहिता) नियम, 2021 मध्ये सुधारणा करून सरकारशी संबंधित बनावट, खोटी किंवा दिशाभूल करणाऱ्या ऑनलाइन मजकूरांतील तथ्य तपासणी करण्यासाठी एका फॅक्ट चेक युनिटची स्थापना करण्याची तरतूद केली होती. याद्वारे मजकुराविरोधात, मध्यस्थी समाजमाध्यम कंपन्यांना माहिती-तंत्रज्ञान कायद्याच्या कलम 79 द्वारे देण्यात आलेलं संरक्षण गमवावं लागणार होतं. याआधी समाज माध्यमांवरून प्रसिद्ध होणाऱ्या मजकुरासाठी या कंपन्यांना जबाबदार धरलं जात नव्हतं. कायद्यातील नवी दुरूस्ती थेट नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचं उल्लंघन असल्याचं मुंबई उच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

### तिरूपतीच्या प्रसादात चरबी आढळल्याचे...

आता त्या तपासणीचे रिपोर्ट समोर आले आहेत. त्यामध्ये प्रसादात फिश ऑईल वापरले जात असल्याचे समोर आले आहे. यावर आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचे स्वीय सहाय्यक आणि तिरुमला देवस्थानचे सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

तिरुमाला देवस्थानच्या प्रसादामध्ये ऑइल असल्याचे समोर आल्याने भाविकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान यावर तिरमल देवस्थान समितीचे सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी भाष्य केले आहे. एका वाक्यात आपली प्रतिक्रिया देताना नार्वेकर यांनी मला या प्रकरणाबाबत काही माहिती नसल्याचे म्हटले आहे. उद्धव ठाकरेंचे निकटवर्तीय आणि विधान परिषदेचे आमदार मिलिंद नार्वेकर यांनी ऑक्टोबर २०२१ मध्ये तिरुमला तिरुपती देवस्थानचे सदस्य म्हणून शपथ घेतली होती.

# द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी ; राजू श्रीवास्तव



प्रसिद्ध स्टॅण्ड अप कॉमेडियन राजू श्रीवास्तव यांचा आज २१ सप्टेंबर रोजी दुसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली होती. त्यांच्या अकाली निधनाने मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली होती. द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी अशी ओळख असलेल्या राजू श्रीवास्तव यांचा २५ डिसेंबर १९५३ रोजी उत्तरप्रदेश मधील कानपुर येथे जन्म झाला. राजू श्रीवास्तव यांचे वडील कवी होते. बलई काका नावाने त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. राजू श्रीवास्तव लहान असताना आपल्या वडिलांच्या कविता म्हणत. शालेय वयातच त्यांना नकला करण्याचा छंद लागला. शाळेतील शिक्षकांच्या व गावातील माणसांच्या ते हुबेहूब नकला करत. पुढे ते अमिताभ बच्चन यांची नक्कल करू लागले.

अमिताभ बच्चन यांचा हुबेहूब आवाज काढून त्यांनी केलेली नक्कल लोकांना इतकी आवडली की लोक त्यांना ज्युनिअर अमिताभ म्हणू लागले. अमिताभ बच्चन यांच्याप्रमाणेच त्यांनी चित्रपट सृष्टीतील इतर कलाकारांची देखील नक्कल करण्यास सुरुवात केली. त्यांचा हा नकलाचा कार्यक्रम प्रेक्षकांना आवडू लागला. कानपूरमधील प्रेक्षक त्यांना कॉमेडीसाठी बोलवू लागले. त्यांचे कार्यक्रम लोकप्रिय होऊ लागले तेंव्हा त्यांच्या एका मित्राने त्यांना त्यांच्या कॉमेडीची सीडी बनवून विकण्याचा सल्ला दिला. मित्राने दिलेला हा सल्ला त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. राजू श्रीवास्तव यांनी त्यांच्या कॉमेडीची सीडी मार्केटमध्ये आणल्यानंतर त्यांच्या सिडीला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला. मुंबईतही त्यांच्या सीडी विकल्या जाऊ लागल्या. मुंबईतही त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली त्यामुळे ते मुंबईत आले आणि चित्रपटांसाठी ऑडिशन देऊ लागले. तेजाब आणि मैने प्यार किया या चित्रपटात त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. त्यांनतर बाजीगर, मिस्टर आझाद या चित्रपटातही त्यांनी भुमीका केल्या मात्र या भूमिकांनी त्यांना समाधान दिले नाही त्यामुळे ते टीव्हीकडे वळले.

देख भाई देख या विनोदी मालिकेत त्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी शक्तिमान या मालिकेत काम केले. चित्रपट आणि टीव्हीवर काम करताना त्यांनी त्यांची स्टॅण्ड अप कॉमेडी काही सोडली नव्हती ते स्टॅण्ड अप कॉमेडी करतच होते. २००५ साली टीव्हीवर द ग्रेट इंडियन लाफटर चॅलेंज नावाचा कॉमेडी शो आला होता. या शो मध्ये त्यांनी भाग घेतला. या शो ने त्यांना स्टार बनवले. या शो मध्ये त्यांनी सादर केलेले गजोधर काका, पिंकी पार्लरवाली ही पात्रे खूप लोकप्रिय झाली. या शो नंतर त्यांचे देशभर नाव झाले. त्यांना अनेक कार्यक्रमांमध्ये बोलावले जायचे. या काळात त्यांची कॉमेडी किंग अशीच इमेज झाली होती. २००९ साली त्यांनी बिग बॉस शो मध्येही भाग घेतला होता. २००५ ते २०१० हा त्यांचा सुवर्णकाळ होता. या काळात त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली होती. त्याचा लाभ घेऊन राजकारणात उतरण्याचा त्यांनी निर्णय घेतला मात्र त्यांना राजकारण मानवले नाही त्यामुळे ते पुन्हा कॉमेडीकडे वळले. त्यांनी आपली स्टॅण्ड अप कॉमेडी पुन्हा सुरू केली. आपल्या स्टॅण्ड अप कॉमेडीने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. राजू श्रीवास्तव यांच्याप्रमाणे अनेकांनी स्टॅण्ड अप कॉमेडी करण्याचा प्रयत्न केला पण राजू श्रीवास्तव यांच्या सारखी नक्कल आणि स्टँड अप कॉमेडी कोणालाही जमू शकली नाही. चित्रपट, टीव्ही आणि स्टेज शो मधून प्रेक्षकांना खळखळून हसवणारे राजू श्रीवास्तव यांचे असे अकाली जाणे प्रेक्षकांना चटका लावून जाणारे ठरले. स्टॅण्ड अप कॉमेडीचे किंग राजू श्रीवास्तव यांना दुसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**




ठाणे - ठाण्यातील राबोडी येथील साकेत येथून जाताना आई लव्ह राबोडी चौकाची दुरावस्था झाले असून या कडे कोण लक्ष देणार?



**ठाणे --- ठाणे शहरातील महिलांसाठी सुवर्णसंधी जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था, महाराष्ट्र (ठाणे शहर विभाग) आयोजित मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण सदर कोर्स मध्ये खालील नमूद प्रशिक्षण मोफत दिले जाईल.ब्लाऊज, फ्रॉक, ड्रेस, कुर्ती पेटीकोट, गाऊन, घागरा-चोळी, नववारी लहान मुलांचे कपडे (झबले, लंगोट, अंगरं - टोपरं) आरी वर्क, कुशन वर्क, मायक्रोनी नेलआर्ट, नथ मेकिंग, मेहंदी या सगळे कोर्स चे उदघाटन समाजवेक निलेश सांबरे यांचा जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थ्यांच्या महिलांनी केले.**




ठाणे -- भाजपाचे नेते व राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसा निमित्ताने भाजपा ठाणे शहर जिल्ह्याच्या वतीने ठाणे रेल्वे स्टेशनबाहेरील सॅटीस पुलालगत भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले या शिबिराचे उदघाटन आमदार संजय केळकर यांचा हस्ते करण्यात आले यावेळी ठाणे शहरजिल्ह अध्यक्ष संजय वाघुले , महिला मोर्चा अध्यक्षा स्नेहा पाटील युवा मोर्चा अध्यक्ष सुरज दळवी , वृषाली वाघुले, श्रुती महाजन सचिन केदारे , यांचा सह भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आकर्षक व पसंतीच्या वाहन नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करावेत

रायगड (जिमाका) :- प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे "VAHAN 4.0" या संगणक प्रणालीवर परिवहन संवर्गातील मालवाहू वाहनांसाठी (Transport Vehicle) सध्या सुरू असेलेली MIH-46-CL मालिका संपल्यानंतर तात्काळ नविन मालिका MII-46-CU सुरू करण्यात येणार आहे. अटींच्या अधिन राहून आकर्षक व पसंतीच्या वाहन नोंदणी क्रमांकासाठी अर्ज (विहीत शुल्काच्या धनाकर्यासह D.D.) दि. २५ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्विकारून पसंतीचे व आकर्षक क्रमांक विहीत शुल्क आकारून आरक्षित करण्यात येतील.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## ग्रामपंचायती अंतर्गत नल जल मित्रांची होणार नियुक्ती इच्छुक व पात्र उमेदवारांनी आपल्या ग्रामपंचायतीशी संपर्क साधावा -मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे

**ठाणे (रोहित जैसवार)** - जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक असल्याने जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये गवंडी/ प्लंबर, मेकॅनिक/फिटर व इलेक्ट्रिशियन/पंप ऑपरेटर याप्रमाणे तीन नल जल मित्र यांची नेमणूक करण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी आपल्या ग्रामपंचायतीशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व प्रकल्प संचालक जल जीवन मिशन अतुल पारसकर यांनी केल आहे.

याबाबत जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती योग्य पद्धतीने व्हावी. या उद्देशाने प्रत्येक ग्रामपंचायती अंतर्गत तीन नल जल मित्र यांची निवड करण्यात येणार आहे. तीन पदांसाठी प्रत्येक पदासाठी तीन याप्रमाणे ९ उमेदवारांची नामनिर्देशने राज्यस्तरावर करण्यासाठी ग्रामपंचायती अंतर्गत माहिती ॲपद्वारे भरायची आहे. ग्रामपंचायतींमार्फत सादर केलेल्या नामनिर्देशनामधून राज्यस्तरावरून उमेदवारांची निवड करण्यात येणार असून निवड झालेल्या नल जल मित्र याना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

यासाठी निश्चित करण्यात आलेल्या कौशल्य संच: १.प्लंबर/ गवंडी ,२.मोटर मेकनिक/फिटर, ३.इलेक्ट्रिशियन/पंप ऑपरेटर या तीन ट्रेडसाठी गावातील अनुभव असलेल्या व उचित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येणार आहे. कौशल्य असलेल्या उमेदवारास गावातच रोजगार उपलब्ध होणार आहे.

पाणीपुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती व शाश्वततेसाठी ग्रामपंचायत स्तरावर तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याकरिता पात्र उमेदवारांनी ग्रामपंचायत सोबत संपर्क साधावा. -मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे

# घोडबंदर रोड वाहतूक कोंडीमुक्त राहण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा सातत्याने घेतला जातोय आढावा

**ठाणे (रोहित जैसवार) :** गेल्या पंधरा दिवसात घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवण्यात बऱ्यापैकी यश मिळाले आहे. वाहतूक कोंडीपासून मुक्तीसाठी करीत असलेल्या या उपाययोजनांचा सातत्याने आढावा घेतला जात असल्याची माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली आहे.

घोडबंदर रोड तसेच अंतर्गत रस्ते यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी सहा सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर आज, शुक्रवारी पुन्हा एकदा उपाययोजना तसेच अडचणी याचा विचार करण्यासाठी बैठकीचे आयोजन महापालिकेच्या नागरी प्रशिक्षण केंद्र येथे करण्यात आले होते.

या बैठकीस ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, उपायुक्त दिनेश तायडे आणि शंकर पाटोळे, उपनगर अभियंता विकास ढोले आणि शुभांगी केसवानी, घोडबंदर रोडचे नोडल ऑफिसर आणि कार्यकारी अभियंता संजय कदम यांच्यासह मेट्रोचे अधिकारी उपस्थित होते.



घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडीच्या समस्येची तड लावण्यासाठी झालेल्या पहिल्या बैठकीमध्ये ठरवण्यात आलेल्या कृती आराखड्यानुसार विविध यंत्रणांनी एकमेकाशी समन्वय राखून उपाययोजना केल्याची आल्याची माहिती पंकज शिरसाट यांनी या बैठकीत दिली. तसेच, सध्या असलेल्या अडचणी व त्यावरील संभाव्य तोडगे यांचे विवेचनही त्यांनी केले. त्याचबरोबर, १२.५ टन क्षमतेच्या पुढील वाहने ही अवजड वाहने आहेत. त्यात सरसकट सर्व मालवाहू वाहने येत नाहीत. त्यामुळे तशी काही मालवाहू वाहने दिसली तर गैरसमज होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. गायमुख घाट, भाईंदर पाडा ते गायमुख या पट्ट्यामध्ये अजूनही वाहतुकीसंदर्भात काही उपाययोजना करण्याची गरज शिरसाट यांनी व्यक्त केली.

दीडशे ते दोनशे टनाच्या गाड्या गायमुख घाटातून जातात त्यामुळे पावसाळयात डांबरी रस्ता सतत खराब होतो. त्यामुळे येथे काँक्रिटीकरणाची आवश्यकता असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधीक्षक अभियंता यांनी दिली. हा मार्ग आता मीरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आला आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर, कापूरबावडी-माजीवडा उड्डाणपुलावरील मुंबईच्या दिशेने असलेल्या यु टर्न ते विवियाना मॉलपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण लवकरच केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मेट्रोलगत सुरू असलेल्या दोन उड्डाणपुलांच्या कामामुळे तेथील मार्गिका छोट्या झाल्या असल्याने सेवा रस्ते अधिक सक्षम करावे, अशी मागणी मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी केली. त्यावर सेवा रस्त्यावरून अवजड वाहतूक करताना अधिक खबरदारी घेण्याची आवश्यकता नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांनी व्यक्त केली. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी आधी सेवा रस्त्याचे सक्षमीकरण करावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. सर्व रस्ते खड्डेमुक्त, समान पातळीचे असतील. त्यावर कुठेही उंचवटे तयार होणार नाहीत, याची खात्री सर्व यंत्रणांनी करावी, असेही निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत. त्याचबरोबर, सेवा रस्ते फेरीवाला मुक्त करणे, पार्किंग हटवणे आणि ओव्हरहेड वायरचा बंदोबस्त करणे ही कामे महापालिका यंत्रणा तत्काळ करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### उलट्या दिशेची वाहतूक रोखण्यासाठी ठाण्यातही होणार 'टायर किलर'चा प्रयोग

रस्त्यावर विरुद्ध दिशेने वाहने चालवण्याच्या प्रकारांमुळे होणारे अपघात, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ठाण्यात प्रायोगिक तत्त्वावर 'टायर किलर' बसवण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. अशी ठिकाणे वाहतूक पोलीस निश्चित करणार आहेत. त्यानंतर तेथे महापालिकेतर्फे 'टायर किलर' बसवण्यात येतील.

हे 'टायर किलर' बसवण्यापूर्वी त्याची सविस्तर माहिती त्या त्या भागात दिली जाईल. अशा प्रकारचे 'टायर किलर' असल्याची माहिती देणारे बोर्ड १०० ते २०० मीटर आधीपासून लावण्यात येतील. या भागात रात्रीच्या वेळेस पुरेसा प्रकाश असल्याची खात्री केली जाईल. तसेच सीसीटीव्ही कॅमेरा क्षेत्रात तो भाग येत असल्याचे निश्चित केल्यानंतर मग हे 'टायर किलर' बसवले जातील. त्यांच्यामुळे विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांना अटकाव होईल, असे महापालिका आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुरबाड येथे दि.२७ सप्टेंबर २०२४ रोजी "मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजना" मेळावा

**ठाणे (सूचित शिंदे) :-** राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता (Employability) वाढविण्यासाठी "मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजना" सन२०२४-२५ या आर्थिक वर्षापासून या शासन निर्णयानुसार शा.नि.क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि-३,दि.०९ जुलै २०२४ व शा.नि.क्र. कौविस-२०२४/प्र.क्र.११८/प्रशा-२, दि.०९ सप्टेंबर २०२४ सुरु झालेली आहे.

मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत रोजगार मेळाव्याचे आयोजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुरबाड येथे दि.२७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. तरी या मेळाव्याकरिता मुरबाड परिसरातील खाजगी आस्थापना येणार असून उमेदवार यांची मुलाखत घेणार आहेत. तरी या योजनेकरिता जास्तीत जास्त उमेदवारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुरबाड चे प्राचार्य अनिरुध्द जव्हारकर यांनी केले आहे.

या योजनेकरीता उमेदवाराची पात्रता पुढीलप्रमाणे आहे. :-

१) उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष असावे. २) उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२ वीपास/ आयटीआय/ पदविका/पदवी/पदव्युत्तरअसावी. मात्र शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेत सहभागास पात्र असणार नाहीत. ३) उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा. ४) उमेदवाराची आधार नोंदणी असावी. ५) उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे. ६) उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करुन रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.

कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे शासनामार्फत विद्यावेतन दिले जाईल. या विद्यावेतनाचे विवरण १. १२ वी पास- रु.६,०००/- प्रतिमाह विद्यावेतन, २. आय.टी.आय/ पदविका- रु. ८,०००/- प्रतिमाह विद्यावेतन, ३. पदवीधर / पदव्युत्तर- रु. १०,०००/- प्रतिमाह विद्यावेतन, अशा प्रकारे आहे.

या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारी (NAPS/MAPS) पूर्ण केलेले व करीत असलेले उमेदवार पात्र राहणार नाहीत, असे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुरबाड चे प्राचार्य अनिरुध्द जव्हारकर यांनी कळविले आहे.

# झोपडपट्टी पुनर्वसनाच्या मागणीसाठी केडीएमसीवर धडकला मोर्चा

### आंदोलनकर्त्यांनी महापालिका मुख्यालयासमोर मांडला ठिय्या

**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीतील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या मागणीसाठी आज कल्याण डोंबिवली महापालिका मुख्यालयावर मोर्चा धडकला. कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीत ७० पेक्षा जास्त झोपडपट्टी ५० वर्षांपासून रेल्वे, सरकारी भूखंडावर वसलेल्या आहेत. तसेच अनेक झोपडपट्ट्या या रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या आहेत. त्यामुळे या झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या नेतृत्वाखाली रहिवाशांनी महापालिका कल्याण डोंबिवली मुख्यालयावर धडक देत मोर्चा काढला. महापालिकेने बीएसयूपी घरकुल योजनेत बांधलेली ८ हजार घर अजूनही पडून आहेत. त्या इमारतीतील घरं या झोपडपट्टी धारकांना देण्यात यावी. कल्याण डोबिवलीतील झोपडपट्ट्यांना



अधिकृत म्हणून घोषित करून मान्यता द्या. बीएसयुपी अंतर्गत इमारतीतील घरे लाभार्थी ना त्वरीत द्या.जर झोपडपट्टीतील रहिवाशांचे पुनर्वसन होत नसेल तर झोपडपट्टी धारकांना मुंबई शहराप्रमाणे वन प्लस श्री ला मान्यता द्या किंवा झोपडीधारकांना २७ फुटांची बांधकाम परवानगी द्या. झोपडपट्ट्यांतील शौचालयांची दुरावस्था दूर करा. झोपडपट्ट्यांतील पायवाटा गटारे, रस्ते यांची डागडुजी-दुरुस्ती करा.

झोपडपट्ट्यांतील नागरिकांची आरोग्याची हेळसांड होत आहे, त्यासाठी पिण्याच्या पाण्याचे फिल्टर प्लांट बसवून द्या. प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर, नर्स आणि औषधोपचार उपलब्ध करुन द्या. अशा विविध मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला. डोंबिवली आणि कल्याण शहरातून निघालेला हा मोर्चा महापालिका मुख्यालयावर धडकला असून त्यांनी महापालिके बाहेर ठिय्या मांडला.

या मोर्चामध्ये रिपाई प्रदेश उपाध्यक्ष अण्णा रोकडे, माजी नगरसेवक भिमराव डोळस, डोंबिवली शहराध्यक्ष अंकुश गायकवाड, ठाणे प्रदेश उपाध्यक्ष माणिकराव उघडे, शहर प्रमुख संजय जाधव, अनिल धनगर, रामा कांबळे, अशोक गायकवाड, संग्राम मोरे, गणेश कांबळे रिपब्लिकन झोपडपट्टी महासंघाचे शेखर सुब्रमण्य, राजू खरात, दिनेश शिंदे आदी पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिक मोर्चात सहभागी झाले होते.

# महात्मा फुले चौक पोलिसांनी आवळल्या सराईत चोराच्या मुसक्या; 3 मोटार सायकल व एक रिक्षा केली हस्तगत




**कल्याण ( विवेक गुंजाळ ) :** कल्याणच्या महात्मा फुले चौक पोलिसांनी मोटार सायकल चोरी करणाऱ्या सराईत आरोपीस पोलीसांनी २४ तासांत अटक करून त्याच्याकडुन एकुण 3 मोटार सायकल आणि एक रिक्षा हस्तगत करून त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत. महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात फिर्यादी जनार्दन मढवी यांनी दिलेल्या तक्रारीवरून मोटार सायकल चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्हयाच्या तपासात गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अमलदार यांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले असता एक इसम हा मोटार सायकल चोरी करून चवुन जाताना दिसत होता. त्यावरून अधिक तपास केला असता सदर इसम हा महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याचे रेकॉर्डवरील मोटार सायकल चोरी करणारा आरोपी कल्याण पूर्वेतील कुणाल साबळे असल्याचे निष्पन्न झाले.

त्याचा गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउनि किरण भिसे व त्यांच्या टीमने शोध घेतला असता तो कल्याण पश्चिम परीसरामध्ये एका मोटार स्कुटरसह येणार असल्याची बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या अनुषंगाने सापळा लावुन त्यास मोटार स्कुटरसह ताब्यात घेतले.

# डोंबिवलीच्या पाण्यासाठी स्वतंत्र ५८५ कोटींची पाणी योजना

**डोंबिवली (सम्यक कासारे)** - डोंबिवलीच्या पाण्यासाठी स्वतंत्र ५८५ कोटींची पाणी योजना मंजूर करण्यात आली असून खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

बारवी पाणी पुरवठा योजनेवरील वाढती मागणीमुळे डोंबिवली औद्योगिक क्षेत्राकरीता कमी दाबाने अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील व परिसरातील ग्राहकाच्या अपु-या पाणी पुरवठयाच्या तक्रारी वाढल्या होत्या. याच पार्श्वभूमीवर कल्याण - डोंबिवली शहरातील काही भाग, डोंबिवली औद्योगिक क्षेत्र आणि आसपासच्या भागातील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा व्हावा यासाठी शहाड पाणी पुरवठा योजना पुनर्जीवित करण्यात येत असून यासाठी एमआयडीसीच्या माध्यमातून ५८५ कोटी रुपयांचा निधीला मंजुरी देण्यात आली आहे. याअंतर्गत जलवाहिनी टाकण्याबरोबरच विविध कामे केली जाणार आहेत. या योजनेच्या पुनर्जीवनासाठी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या पाठपुराव्याला यश मिळाले असून कल्याण, डोंबिवली आणि आसपासच्या विभागातील



नागरिकांची पाण्याची समस्या मार्गी लागणार आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातुन मतदारसंघातील शहरांना मुबलक पाणी पुरवठा करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या ग्रामीण भागातील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा व्हावा यासाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीतून जल जीवन मिशन राबविण्यात येत आहे. याच पद्धतीने कल्याण, डोंबिवली, डोंबिवली औद्योगिक क्षेत्र आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा व्हावा यासाठी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी राज्याचा पाणी पुरवठा विभाग, एमआयडीसी यांच्या समवेत सातत्याने बैठका घेऊन वाढीव पाणी पुरवठ्याची मागणी केली होती. यामागणीनुसार कल्याण डोंबिवली शहराला वाढीव पाणी पुरवठा देखील मिळाला आहे. मात्र यापुढेही जाऊन नागरिकांना अधिक दाबाने मुबलक पाणी पुरवठा व्हावा यासाठी गेले काही वर्ष बंद असलेली शहाड पाणी पुरवठा योजना पुन्हा सुरु करण्यासाठी खासदार डॉ. शिंदे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. शहाड येथे १८० द. ल ली. प्रति दिन क्षमतेची शहाड पाणी पुरवठा योजना सन १९६६ पासून तीन टप्यात बांधण्यात आली होती. या योजनेतून उल्हासनगर, कल्याण, डोंबिवली तसेस डोंबिवली औधोगिक क्षेत्र साठी पाणी पुरवठा करण्यात येत होता. बारवी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झाल्यावर कालांतराने शहाड पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा फक्त उल्हास नगर शहरासाठी सीमित करण्यात आला आहे. शहाड पाणी पुरवठा योजनेतून सध्या १२० द.ल.ली. प्रतिदिन पाणी पुरवठा केला जातो.

## सहयोग सामाजिक संस्थे मार्फत कचरामुक्तीसाठी कुंपणकुंडीचे लोकार्पण



**कल्याण (आकाश कांबळे):** कल्याण पूर्वेतील पूनालिंक रोडवर सेंट्रल बँकेच्या बाजूला रस्त्यावर खूप कचरा पडत असल्याने हा कचरा रस्त्यावर येत असे त्यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरते. म्हणून त्या ठिकाणी सहयोग संस्थे मार्फत लोखंडी तारेची कुंपण असलेली कुंडी ठेवण्यात आली. जेणे करून कचरा रस्त्यावर न येता त्या कुंडीत पडतो. आज या कुंपण कुंडीचे लोकार्पण जे प्रभागाचे सहायक आयुक्त सचिन तामखडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास स्थानिक माजी नगरसेवक निलेश शिंदे, माजी नगरसेविका माधुरी काळे तसेच ड प्रभाग सहायक आयुक्त सविता हिले, बांधकाम उपअभियंता धर्मेंद्र गोसावी, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक खैरे, मुकादम संतोष साळुंखे, माजी परिवहन सभापती सुभाष म्हस्के, ज्येष्ठ समाजसेवक कालिदास कदम, प्रमोद दिवेकर, अभिषेक बने, रवी देवळे, खरात, राकेश झांजे, कमलेश पांडे, सहयोग सामाजिक संस्था अध्यक्ष विजय भोसले, स्टडी वेव्ज संस्थेचे अध्यक्ष उमाकांत चौधरी आदीजण उपस्थित होते.

# देशाच्या जडण घडणीत तरुणांचा वाटा असला पाहिजे – कपिल पाटील

### मुथा महाविद्यालय आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

**कल्याण (गणेश बागडे) :** तरुणांची शक्ती मर्यादित न ठेवता देशाच्या जडण घडणीत त्यांचा वाटा असला पाहिजे. त्याचा पाया 2020 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घातला आणि त्यातूनच कौशल्य विकास योजना जन्माला आली. युवकांमध्ये अडलेल्या हिऱ्याला पैलू पाडण्याचे काम यातून होणार आहे असा विश्वास माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी आज व्यक्त केला. कल्याण मधील शेठ हिराचंद मुथा महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



यावेळी महात्मा फुले वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे, महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रकाश मुथा, ट्रस्टी अन्वेशा मुथा, मनीष मुथा, माहिती स्किल हब एज्युकेशन प्रा लिमिटेडचे संस्थापक आशिष शिंदे, तलाठी भास्कर पाटील, कल्याण महसूल मंडळ अधिकारी दीपक गायकवाड उपस्थित होते. आविष्कार हीच आवश्यक ची जननी असल्याने कौशल्य विकास नितिवर लक्ष दिले पाहिजे असे मत यावेळी महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रकाश मुथा यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र राज्यातील एक हजार महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजनेचा शुभारंभ आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वर्धा येथे पार पडला. या प्रशिक्षण केंद्रामध्ये महाराष्ट्र मधील एकूण 58 महाविद्यालयात कल्याण मधील शेठ हिराचंद मुथा महाविद्यालय सहभागी आहे.





ठाणे - गणेश चतुर्थी नंतर नवरात्रीचे लगबग सुरु झाली आहे देवी च्या मूर्ती ला आकार व कलर देताना कलाकार.

# कार्डिओ व्यायाम वेट ट्रेनिंगपूर्वी करावा की नंतर ?



सध्या धावपळीच्या आयुष्यात अनेक जण आरोग्याकडे लक्ष देत नाही, त्यामुळे आरोग्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. मात्र, काही फिटनेसप्रेमी दररोज न चुकता जिमला जातात. खरं तर जिममध्ये दोन प्रकारचा व्यायाम केला जातो. एक म्हणजे कार्डिओ व्यायाम आणि दुसरा वेट ट्रेनिंग. पण, कार्डिओ व्यायाम वेट ट्रेनिंगपूर्वी करावा की नंतर हा प्रश्न अनेकांना पडतो. तुम्हालाही हा प्रश्न पडतो का? आज आपण याविषयी जाणून घेणार आहोत.

खरं तर कार्डिओ आणि वेट ट्रेनिंग हे फिटनेसच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. या दोन्हींचे महत्त्व समजून घेतले तर त्याचा योग्य फायदा तुम्ही घेऊ शकता.

कार्डिओ व्यायाम वेट ट्रेनिंगपूर्वी करावा की नंतर?

कार्डिओ व्यायाम वेट ट्रेनिंगपूर्वी करावा की नंतर, याविषयी द इंडियन एक्स्प्रेसनी तज्ज्ञांच्या हवाल्याने सविस्तर माहिती जाणून घेतली.

प ॉ व र मॅ क स चे व्यवस्थापकीय संचालक संजय गोयल म्हणतात, "वेट ट्रेनिंगपूर्वी किंवा नंतर कार्डिओ व्यायाम करणे हे त्या व्यक्तीचं ध्येय आणि ती व्यक्ती कोणत्या गोष्टीला प्राधान्य देते, यावर अवलंबून आहे."

ते पुढे सांगतात, "कार्डिओ व्यायाम हे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी, तसेच मानसिक आरोग्य जपण्यासाठी आणि कॅलरीज कमी करण्यासाठी एक चांगला पर्याय ठरू शकतो. वजन कमी करण्यासाठीसुद्धा हा व्यायाम अत्यंत फायदेशीर आहे."

वेट ट्रेनिंगसाठी अति ऊर्जेचा वापर केला जातो, पण त्यामुळे स्नायू अधिक मजबूत होतात. वेट ट्रेनिंगनंतर कार्डिओ केल्याने आपली कार्यक्षमता वाढते. गोयल सांगतात, "वेट ट्रेनिंग केल्यानंतर कार्डिओ केल्याने स्नायू मजबूत होण्यास मदत होऊ शकते, पण वेट ट्रेनिंगमुळे थकवा येऊ शकतो ज्याचा थेट परिणाम कार्डिओ व्यायामावर होऊ शकतो. थकव्यामुळे तुमचा कार्डिओ व्यायाम काही वेळा अपूर्णसुद्धा राहू शकतो."

आरोग्यतज्ज्ञ डॉ. मिकी मेहता सांगतात, "मी गोयल यांच्याशी सहमत आहेत. थोडा वॉर्मअप केल्यानंतर कार्डिओ करा, ज्यामुळे तुम्ही चांगले वेट ट्रेनिंग करू शकता."

कार्डिओ आणि वेट ट्रेनिंगचा क्रम का महत्त्वाचा?

गोयल यांच्या मते, तुम्ही ज्या क्रमाने कार्डिओ आणि वेट ट्रेनिंग करता, त्याचा तुमच्या एकूण फिटनेस आणि स्नायूंच्या आरोग्यावर परिणाम होतो.

ते पुढे सांगतात, "वेट ट्रेनिंगपूर्वी हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित व्यायाम (कार्डिओ) केल्याने स्नायूंना थकवा येऊ शकतो, ज्यामुळे शरीराची कार्यक्षमता कमी होऊ शकते; याशिवाय खूप वजनी वस्तू उचलण्यासाठी आवश्यक असलेला ग्लायकोजेनचा साठासुद्धा कमी होऊ शकतो.

याउलट, कार्डिओपूर्वी वेट ट्रेनिंग केल्याने लोकांची स्ट्रेंथ ट्रेनिंगसाठी जास्तीत जास्त ऊर्जा खर्च होते. यामुळे वेट ट्रेनिंग कठीण जाते. स्ट्रेंथ ट्रेनिंग स्नायू तयार करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे."

वेट ट्रेनिंगनंतर कार्डिओ केल्याने रक्त प्रवाह वाढतो आणि चरबी कमी करण्यास मदत होते, ज्यामुळे स्नायूंचे आरोग्य सुधारू शकतात. ज्यांना स्नायू मजबूत करायचे आहे त्यांनी कार्डिओपेक्षा वेट ट्रेनिंग किंवा वेट लिफ्टिंगला अधिक प्राधान्य द्यावे.

विशिष्ट प्रकारचे कार्डिओ व्यायाम वेट लिफ्टिंगसह करू शकता. गोयल सांगतात, " वेटलिफ्टिंग हे कमी ते मध्यम प्रकारच्या कार्डिओ व्यायामासह केले जाऊ शकते. उदा. "सायकलिंग किंवा चालणे हे व्यायाम वार्मअप करण्यास मदत करतात, कारण ते भरपूर ऊर्जा न वापरता रक्त प्रवाह सुधारण्यास आणि दुखापतीचा धोका कमी करण्यास मदत करतात."

ते पुढे सांगतात, "वेट लिफ्टिंगनंतर धावणे किंवा High-Intensity Interval Training (HIIT) सारखे उच्च-तीव्रतेचे कार्डिओ करणे उत्तम आहे. या व्यायामासह स्ट्रेंथ ट्रेनिंग केल्याने फॅट कमी करण्यास आणि स्नायू बळकट करण्यास मदत होते. तसेच हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आरोग्य सुदृढ ठेवण्यास मदत होते."

वेळ खूप महत्त्वाची आहे हे सांगताना गोयल म्हणतात, "कमी तीव्रतेच्या कार्डिओ व्यायामामुळे थकवा येत नाही आणि शरीर वेट लिफ्टिंगसाठी तयार असते. जेव्हा उच्च तीव्रतेचे कार्डिओ केले जाते, तेव्हा शरीरातील ऊर्जा स्ट्रेंथ ट्रेनिंगसाठी वापरली जाते, ज्यामुळे स्नायूंची वाढ होते आणि शरीराची कार्यक्षमता वाढते.

## करीना कपूर खानचे गाजलेले 'हे' क्राइम-थ्रिलर चित्रपट तुम्ही पाहिलेत का? OTT वर आहेत उपलब्ध



मागच्या शुक्रवारी १३ सप्टेंबरला करीना कपूर खानचा 'द बकिंगहॅम मर्डर्स' चित्रपट थिएटर्समध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटातील तिच्या भूमिकेचं समीक्षक कौतुक करत आहेत. हंसल मेहता दिग्दर्शित हा चित्रपट एक थ्रिलर मिस्ट्री आहे. या चित्रपटाला सिनेमागृहांमध्ये फारस चांगला प्रतिसाद मिळालेला नाही. कमाईच्या बाबतीत चित्रपटाने अजून १० कोटींचा टप्पा पार केलेला नाही.

तुम्ही करीना कपूरचे चाहते असाल तर तिचे अनेक क्राइम- थ्रिलर चित्रपट ओटीटीवर पाहू शकता. करीनाने नुकतीच इंडस्ट्रीत २५ वर्षे पूर्ण केली आहेत. या काळात तिने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. काही सिनेमात तिचा रोमँटिक अवतार पाहायला मिळाला, तर काहींमध्ये ती ॲक्शन करताना दिसली. ओटीटीवर उपलब्ध असलेल्या तिच्या क्राईम थ्रिलर चित्रपटांबद्दल जाणून घेऊयात.

२०२३ मध्ये रिलीज झालेल्या 'जाने जान' या चित्रपटात करीना कपूरसह जयदीप अहलावत आणि विजय वर्मा यांच्या महत्त्वाच्या भूमिका होत्या. या चित्रपटात करीनाने साकारलेले पात्र प्रेक्षकांना फार आवडले होते. हा चित्रपट फक्त ओटीटीवर प्रदर्शित करण्यात आला होता. तुम्ही ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर हा चित्रपट पाहू शकता.

२००४ मध्ये प्रदर्शित झालेला अब्बास-मस्तान दिग्दर्शित 'ऐतराज' चित्रपट प्रेक्षकांना आवडला होता. करीना कपूर, प्रियांका चोप्रा आणि अक्षय कुमार यांच्या मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट एक रोमँटिक थ्रिलर आहे. आपल्या पतीला निर्दोष सिद्ध करण्यासाठी पत्नी काय करते ते या चित्रपटात पाहायला मिळालं होतं. हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्म झी 5 वर पाहता येईल.

# जसप्रीत बुमराह चारशे पार

## कपिल देव, शमी, झहीर यांच्या मांदियाळीत पटकावले स्थान



भारतीय क्रिकेट संघाचा महत्त्वाचा आणि स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने चेन्नई येथे बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात आपल्या क्रिकेट कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा गाठला. बुमराहने पहिल्या डावात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४०० विकेट पूर्ण केले आणि अशी कामगिरी करणारा तो सहावा भारतीय वेगवान गोलंदाज ठरला. बुमराहने हरभजन सिंगला मागे टाकलं आहे. बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या डावात ९ धावा करत खेळत असलेल्या हसन महमूदला विराट कोहलीकरवी झेलबाद करताच बुमराहने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ४०० विकेट्स पूर्ण केले. अशी कामगिरी करणारा बुमराह सहावा भारतीय वेगवान गोलंदाज ठरला. कपिल देव, झहीर खान, जवागल श्रीनाथ, मोहम्मद शमी आणि इशांत शर्मा हे भारतीय गोलंदाज आहेत, ज्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४०० किंवा त्याहून अधिक विकेट घेतले आहेत. आता या महान खेळाडूंच्या यादीत बुमराहही सामील झाला आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट घेणारे भारतीय वेगवान गोलंदाज

६८७ – कपिल देव

६१० – झहीर खान

५५१ – जवागल श्रीनाथ

४४८ – मोहम्मद शमी

४३४ – इशांत शर्मा

४०० – जसप्रीत बुमराह</p>

बुमराहने हरभजनचा विक्रम मोडला

बुमराहने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २२७ डावात ४०० विकेट घेतले आहेत तर भज्जीने २३७ डावांमध्ये ही कामगिरी केली होती. आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात कमी डावात ४०० विकेट घेणाऱ्या भारतीय गोलंदाजांच्या यादीत बुमराह पाचव्या क्रमांकावर आहे तर भज्जी आता सहाव्या स्थानावर घसरला आहे.

## 'रोहित-विराट'ला बाद करूनही महमूद हसन असंतुष्ट!



बांगलादेशचा गोलंदाज हसन महमूद याने भारताविरुद्धच्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या दिवशी गुरुवारी पहिल्या सत्रात तीन विकेट्स घेत चर्चेत आला. या युवा गोलंदाजाला फार उत्साहाने सेलिब्रेशन करायला आवडत नाही. २४ वर्षीय बांगलादेशी गोलंदाजाने रोहित शर्मा, विराट कोहली आणि शुबमन गिलसारख्या फलंदाजाला बाद केले. त्याचा हा चौथा कसोटी सामना आहे. दिग्गज फलंदाजांना बाद केल्यानंतर तो फार उत्साहाने सेलिब्रेशन करेल, अशी अपेक्षा होती, पण त्याने तसे काहीही केले नाही. हसन महमूदने फक्त आपल्या संघातील सहकाऱ्यांची गळाभेट घेतली. त्याचबरोबर सहकाऱ्यांसोबत हँडशेकपर्यंतच मर्यादित ठेवले. त्याने पहिल्या दिवसाच्या खेळात पहिल्या तासातच टीम इंडियाची टॉप ऑर्डर उद्ध्वस्त केली. विशेष म्हणजे विराट-रोहितसारख्या दिग्गज खेळाडूंची विकेट घेतल्यानंतर फार उत्साहाने सेलिब्रेशन सेलिब्रेशन न करत चाहत्यांची मनं जिंकली. पहिल्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर महमूद हसनने सांगितले की त्याने विकेट्स घेतल्यानंतर अति उत्साहाने सेलिब्रेशन का केले नाही? त्याबद्दल जाणून घेऊया.

## दिनविशेष

**घटना**

२०२२ : रशिया अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी आंशिक एकत्रीकरण करण्याची घोषणा केली.

१९९९ : ची-ची भूकंप - तैवानमध्ये झालेल्या भूकंपामध्ये किमान २४०० लोकांचे निधन.

१९९१: आर्मेनिया देश सोव्हिएत संघापासून स्वतंत्र झाला.

१९८४ : संयुक्त राष्ट्र - ब्रुनेई देशाचा संयुक्त राष्ट्रात प्रवेश.

१९८१: सँड्रा डे ओ'कॉनर यांना सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायमूर्ती म्हणून अमेरिकन सिनेटने एकमताने मान्यता दिली.

१९८१ : बेलिझे - देश युनायटेड किंगडमपासून स्वतंत्र झाला.

**जन्म**

१९८१ : रिमी सेन भारतीय अभिनेत्री

१९८०: करीना कपूर भारतीय अभिनेत्री

१९७९: ख्रिस गेल - जमैकाचे क्रिकेटपटू

१९६३ : जीवा - भारतीय दिग्दर्शक, सिनेमॅटोग्राफर आणि पटकथा लेखक (निधन: २५ जून २००७)

१९६३ : कर्टली अँब्रोस - वेस्ट इंडीजचे क्रिकेटपटू

१९५४: शिंजो ॲबे - जपानचे माजी पंतप्रधान (निधन: ८ जुलै २०२२)

१९४४: राजा मुजफ्फर अली चित्रपट निर्माते, कवी, कलाकार आणि सामाजिक कार्यकर्ते

**मृत्यू**

२०२२: सेदापट्टी मुथिया - भारतीय राजकारणी, खासदार (जन्म: ४ ऑक्टोबर १९४५)

२०२२ : राजू श्रीवास्तव - भारतीय अभिनेते आणि कॉमेडियन (जन्म: २५ डिसेंबर १९६३)

२०१२ : गोपालन कस्तुरी पत्रकार, द हिंदू वृत्तपत्राचे संपादक (जन्म: १७ डिसेंबर १९२४)

१९९८ : फ्लॉरेन्स ग्रिफिथ जॉयनर अमेरिकेची धावपटू (जन्म: २१ डिसेंबर १९५९)

१९९२: ताराचंद बडजात्या चित्रपट निर्माते, राजश्री प्रॉडक्शनचे संस्थापक (जन्म: १० मे १९१४)

१९९१ : गॉर्डन बॅशफोर्ड इंग्लिश अभियंते, रेंज रोव्हर कंपनीचे सह-रचनाकार (जन्म: २७ ऑगस्ट १९१६)

१९८३ : बडा राजन मॉबस्टर आणि अंडरवर्ल्ड डॉन

१७४३: सवाई जयसिंग (दुसरे) - अम्बर संस्थानचे राजे (जन्म: ३ नोव्हेंबर १६८८)

## "वाइल्ड कार्ड एन्ट्री", संग्राम चौगुलेवर टीका करत मराठी अभिनेत्याने अरबाजचं केलं कौतुक

'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वातील वाइल्ड कार्ड सदस्य संग्राम चौगुलेची सध्या चांगलीच चर्चा सुरू आहे. कारण आहे नुकताच झालेला कॅप्टन्सी टास्क. या कॅप्टन्सी टास्कमध्ये संग्राम अरबाजच्या बाजूने खेळताना दिसला. संग्राम 'बी टीम'मध्ये असूनही 'ए टीम'मधल्या अरबाजबरोबर स्ट्रॅटजी करताना पाहायला मिळाला. एवढंच नाहीतर कॅप्टन्सी टास्कच्या निर्णायक फेरीत तो अरबाजला रोखू शकला नाही. यामुळे सध्या मराठी कलाकारांसह नेटकरी संग्राम चौगुलेवर टीका करताना दिसत आहेत. "संग्रामला अक्कल नाही. फक्त शरीर आहे. त्याने मेंदू घरी ठेवलाय", "संग्राम खूप वाईट आहे. त्याने संपूर्ण टीमचा विश्वासघात केला", "हा फुसका बॉम्ब निघाला", "संग्राम भित्रा वाटतोय", "हा पुढच्या आठवड्यात घराबाहेर येणार. याला खेळ काही समजला नाही. हा शो बघून आला तरी पण काही उपयोग नाही", अशा अनेक प्रकारच्या प्रतिक्रिया नेटकऱ्यांच्या उमटल्या आहेत. नेटकऱ्यांनी संग्रामच्या खेळावर नाराजी व्यक्त केली आहे. मराठी कलाकार देखील सोशल मीडियावर पोस्ट करून संग्रामच्या खेळाविषयी बोलत आहेत. कॅप्टन्सी टास्कच्या पहिल्याच फेरीत संग्रामने अरबाजबरोबर डील केली.

# रेल्वे प्रवासातील 'त्या' प्रसंगाने अशोक सराफांना शिकवला धडा

सचिन पिळगांवकर निर्मिती आणि दिग्दर्शित 'नवरा माझा नवसाचा २' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस आला आहे. आजपासून चित्रपटगृहात 'नवरा माझा नवसाचा २' प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात सचिन पिळगांवकर, सुप्रिया पिळगांवकर, अशोक सराफ, स्वप्निल जोशी, हेमल इंगळे, निर्मिती सावंत अशी तगडी कलाकार मंडळी पाहायला मिळणार आहे. याच निमित्ताने चित्रपटाची टीम विविध एंटरटेनमेंट चॅनेलशी संवाद साधताना दिसत आहे. याच वेळी अशोक सराफ यांनी रेल्वेतील एक प्रसंग सांगितला. ज्यामुळे त्यांना एक धडा मिळाला.



नुकताच 'प्लॅनेट मराठी' या एंटरटेनमेंट युट्यूब चॅनेलशी 'नवरा माझा नवसाचा २' चित्रपटाच्या टीमने संवाद साधला. यावेळी अशोक सराफ यांना रेल्वेच्या प्रवासातील एखादी आठवण विचारली. तेव्हा अशोक सराफ यांनी मुंबई ते कोल्हापूर असा प्रवास करत असताना घडलेला प्रसंग सांगितला. अशोक सराफ म्हणाले, "मला एकदा थर्ड क्लासचं तिकीट दिलं होतं. मुंबईवरून कोल्हापूरला जायचं होतं. त्यामुळे कशाला टू-टियर आणि एसी पाहिजे, असं मत होतं. त्यामुळे मी थर्ड क्लासमधून जात होतो. आमचं सगळं युनिट बसलं होतं. आम्ही आपापसात गप्पा मारत होतो. समोरच्या सीटवर दोन जण बसले होते. एक जण सारखा माझ्याकडे बघत होता. मी म्हटलं, अरे बापरे याने ओळखलेलं दिसतंय. बऱ्याच वेळ त्या माणसाने बघितल्यानंतर त्याने आपल्या बाजूच्या माणसाला विचारलं, ओळखलंस का यांना… अशोक सराफ… हे सगळं त्याचं मी ऐकत होतो. 'पांडू हवालदार' अशा मोठ्या चित्रपटांमध्ये त्यांनी काम केलंय. तेव्हा बाजूचा माणूस म्हणाला, मी यांना केव्हाच ओळखलं.

## राशि भविष्य

**मेष** — समाधानी आयुष्यासाठी आपल्या मनाचा कणखरपणा सुधारा. घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. तुम्हाला गरज भासलीच तर मित्र मदतीला धावून येतील. तुम्ही तुमच्या प्रिय पत्नीशी पूर्वी झालेल्या मतभेदांबद्दल तिला माफ कराल तर तुमचे जीवन सुकर होईल.

**सिंह** — आरोग्य एकदम चोख असेल. झटपट पैसा कमावण्याची तुम्हाला इच्छा होईल. प्रिय व्यक्तीसोबत वादावादी होऊ नये यासाठी वादग्रस्त विषय टाळा. आजच्या दिवशी डेटवर जाणार असाल तर विवादात्मक विषय काढणे टाळा. तोलामोलाच्या व्यक्तींशी व्यवहार करताना, आपण आज आत्मसात केलेले, अधिकाधिक ज्ञान तुमच्या व्यक्तीमत्त्वाला वेगळीच धार देईल.

**धनु** — उच्च कॅलरी असणारा आहार टाळा, ठरलेला व्यायाम आजिबात टाळू नका. जीवनाच्या वाईट कामात पैसा तुमच्या कामी येईल म्हणून, आज पासूनच आपल्या पैश्याची बचत करण्याचा विचार करा अथवा तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**वृषभ** — खेळावर काही रक्कम खर्च करा, कारण निंरतर चिरस्थायी तरुणाईचे ते गुपित आहे. कार्य क्षेत्रात किंवा व्यवसायात तुमचा निष्काळजीपणा आज तुम्हाला आर्थिक नुकसान देऊ शकतो. कुटुंबीय आणि मित्रांबरोबर आनंदी क्षण मिळवाल. तुमच्या नात्यातल्या सगळ्या तक्रारी आज निघून जातील.

**कन्या** — आणखी आशावादी राहण्यासाठी स्वत:ला प्रवृत्त करा. त्यामुळे तुमचा आत्मविश्वास आणि परिवर्तनशीलता, लवचिकता वाढेल, पण त्याच वेळी भीतीपोटी, चिंतेमुळे निर्माण होणाऱ्या द्वेषमूलक वैरभावाचा त्याग करा. जे लोक शेअर बाजारात पैसा लावतात आज त्यांना नुकसान होऊ शकते.

**मकर** — आज तुम्हाला महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील - त्यामुळे तुम्ही तणावपूर्ण व्हाल आणि कमालीचे उदास व्हाल. तुमचा शेजारी आज तुमच्याकडून धन उधार मागण्यास येऊ शकतो. तुम्ही त्यांना धन देण्यापूर्वी त्याची विश्वसनीयता जाणून घ्या अथवा धन हानी होऊ शकते.

**मिथुन** — तणावाकडे दुर्लक्ष करू नका. तंबाखूसेवन आणि मद्यसेवनासारखेच तणाव हाही संसर्गजन्य विकार आहे. आज तुम्ही आपले धन धार्मिक कार्यात लावू शकतात ज्यामुळे तुम्हाला मानसिक शांतता मिळण्याची पूर्ण शक्यता आहे. कुटुंबातील एखाद्या स्त्रीचे आरोग्य काळजी करण्याजोगे होईल.

**तूळ** — शारीरिक आजारातून बरे होण्याचे शक्यता मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे तुम्ही खेळाच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकाल. आज तुमची काही चल संपत्ती चोरी होऊ शकते म्हणून, जितके शक्य असेल याची काळजी घ्या. तुमचे कुटुंबीय आणि मित्रमंडळींकडून तुम्हाला पाठिंबा मिळाल्याने आज तुम्ही उत्साहाने व आत्मविश्वासाने वाटचाल कराल.


**कुंभ** — चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. प्रलंबित देणी आल्यामुळे आपली सांपत्तिक स्थिती सुधारेल. संध्याकाळी अचानक पाहुणे आल्याने घरात गर्दी होईल. प्रेम प्रकरणात तुमच्याबद्दल गैरसमज होईल. एका पायरीवर एका वेळी महत्त्वाचे बदल केलेत तर यश निश्चितपणे तुमचेच आहे.

**कर्क** — तुमचे अथक प्रयत्न आणि कुटुंबातील सदस्यांचा वेळीच मिळालेला पाठिंबा यामुळे अपेक्षित निकाल तुम्हाला मिळतील. परंतु, सातत्याने श्रम करणे चालू ठेवा. कुणी जवळच्या नातेवाइकाच्या मदतीने आज तुम्ही आपल्या व्यवसायात उत्तम प्रगती करू शकतात ज्यामुळे तुम्हाला आर्थिक लाभ ही होईल.

**वृश्चिक** — तुम्ही खूपच तणावाखाली असाल तर, आपल्या मुलांबरोबर अधिक वेळ व्यतीत करा. त्यांचे प्रेमाने जवळ येणे, तुम्हाला मिठी मारणे किंवा केवळ एक निष्पाप हास्यदेखील तुम्हाला तुमच्या चिंतांपासून दूर नेईल. या राशीतील विवाहित जातकांना आज सासरच्या पक्षाकडून धन लाभ होण्याची शक्यता आहे.

**मीन** — राग अनावर झाल्याने बाचाबाची आणि संघर्ष होऊ शकतो. दीर्घ मुदतीसाठी गुंतवणूक केलीत तर तुम्हाला भरघोस नफा होईल. दूरच्या नातेवाईकांडून आलेली बातमी तुमचा दिवस उजळून टाकेल. तुमचा प्रेमी आज तुमच्या गोष्टीला ऐकण्यापेक्षा जास्त आपल्या गोष्टी सांगणे पसंत करेल ज्यामुळे तुम्ही थोडे खिन्न होऊ शकतात.

# नाशिकमध्ये वसतिगृहात विद्यार्थिनीची आत्महत्या




**नाशिक (सचिन कदम) -** शहरातील क. का. वाघ शिक्षण संस्थेच्या वसतिगृहात १८ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थिनीने पंख्याला गळफास घेतला. आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नाही. अस्मिता संजय पाटील (१८, ताहाराबाद रस्ता, सटाणा) असे या विद्यार्थिनीचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी ही घटना उघडकीस आली. पंचवटीतील अमृतधाम परिसरात वाघ शिक्षण संस्थेचे तंत्रनिकेतन महाविद्यालय आहे. येथे स्थापत्य शाखेत दुसऱ्या वर्षात अस्मिता शिक्षण घेत होती. महाविद्यालय परिसरातील मुलींच्या वसतिगृहात ती वास्तव्यास होती.

गणेशोत्सवात काही दिवस सुट्टी असल्याने ती सटाणा येथे घरी गेली होती. गुरुवारी ती गावाहून वसतिगृहात परतल्याचे नातेवाईक व परिचितांकडून सांगण्यात आले. अन्य सहकारी विद्यार्थिनी गावी गेल्या असल्याने खोलीत ती एकटीच होती. रात्री अस्मिता भोजनासाठी आली नाही. सकाळी ती चहा-नाश्त्यासाठी न आल्यामुळे वसतिगृहातील एका मैत्रिणीने खोलीचा दरवाजा वाजवून तिला उठविण्याचा प्रयत्न केला. परंतु, आतून प्रतिसाद न मिळाल्याने वसतिगृहाच्या प्रमुखांना कल्पना देण्यात आली. त्यानंतर अस्मिताने गळफास घेतल्याचे दिसून आले.

# अर्थसहाय्यासह अल्पवयीन पीडितांचे समुपदेशन करणे सरकारचे कर्तव्य, उच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती

**मुंबई (यश सावंत):** लहान मुलांवरील लैंगिक अत्याचार संरक्षण कायद्यांतर्गत (पोक्सो) दाखल गुन्ह्यातील अल्पवयीन पीडितांना आर्थिक आणि वैद्यकीय सहाय्य देण्यासह त्यांना या मानसिक धक्क्यातून बाहेर काढण्यासाठी त्यांचे समुपदेशन करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे, असे उच्च न्यायालयाने गुरूवारी स्पष्ट केले. तसेच, पीडिता किंवा त्यांच्या कुटुंबियांना मदतीसाठी उच्च न्यायालयाची पायरी चढावी लागणार नाही याची काळजी घेण्याचेही न्यायालयाने सरकारला बजावले. साकीनाका येथील चार वर्षांच्या मुलीवर अल्पवयीन मुलाने केलेल्या लैंगिक अत्याचाराप्रकरणी दाखल याचिकेवरील सुनावणीच्या वेळी न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला त्यांच्या कर्तव्याची आठवण करून दिली. तसेच, साकीनाका प्रकरणातील अल्पवयीन पीडितेच्या



समुपदेशनाचे काय ? तिचे आणि तिच्या पालकांचे समुपदेशन केले का ? अशी विचारणा न्यायालयाने केली. त्याचप्रमाणे या प्रकरणातील बाल कल्याण समिती व महिला आणि बालकल्याण विभागाच्या भूमिकेवरही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला.

बालकल्याण समितीने या प्रकरणात काय पावले उचलली ते सांगा, असे विचारताना पोक्सोंतर्गत दाखल गुन्ह्यातील पीडितांचे सरकारकडून समुपदेशन आणि पुनर्वसन करणे आवश्यक असल्याचेही अधोरेखीत केले. पोक्सो कायद्यांतर्गत प्रत्येक पीडितेला आर्थिक आणि वैद्यकीय मदत मिळायला हवी. परंतु, त्यासह त्यांना मानसिक आधार देण्यासाठी पीडितांचे समुपदेशन करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. पोक्सो प्रकरणांमध्ये पीडितांचे जबाब त्वरीत नोंदवणे कायद्याने बंधनकारक असल्याचे न्यायालयाने मागील सुनावणीच्या वेळी म्हटले होते. तसेच, साकीनाका पोलीस ठाण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, गुन्हा नोंदविण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांना पोलीस उपायुक्तांनी ९ सप्टेंबर रोजी नोटीस बजावल्याची माहिती मुख्य सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी न्यायालयाला दिली. तसेच, पीडितेचा जबाब ९ सप्टेंबर रोजी नोंदवल्याचेही सांगितले. त्यावर, हे प्रकरण पोक्सोअंतर्गत येत असूनही प्रकरणाची प्रक्रिया जलद करण्यासाठी पोलिसांनी काहीच केले नसल्याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. तेव्हा, जबाब नोंदविण्यास पीडिता तयार होत नाही. नेमून दिलेल्या तारखेला जबाब नोंदवण्यासाठी गेलेल्या पोलिसांना तो रित्या हाती परत यावे लागते. तसेच, प्रकरणातील पीडितेला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने नुकसानभरपाई म्हणून तीन लाख रुपये दिले आहेत. भरपाईच्या रकमेचा एक भाग पीडितेच्या पालकांच्या खात्यात जमा करण्यात आला असून उर्वरित रक्कम पीडिता सज्ञान होईपर्यंत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात आल्याचे वेणेगावकर यांनी न्यायालयाला सांगितले.

# सराफी पेढीतून ३२ लाखांचे दागिने चोरून कारागिर पसार



**पुणे (अभिजित येरल्लू) :** रविवार पेठेतील एका सराफी पेढीतून ३२ लाख रुपयांचे दागिने चोरून कारागिर पसार झाल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी फरासखाना पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत असित पोरिया (वय ४२ रा. मंगळवार पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. याप्रकरणी सराफी पेढीतील कामगार अमित पाल. मुकेश पंखीरा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोरिया यांची रविवार पेठेत श्रीकृष्ण गोल्डस्मिथ पेढी आहे. सराफ बाजारातील व्यावसायिक वेगवेगळे प्रकारचे दागिने घडविण्याचे काम पोरिया यांना देतात. त्यांच्या पेढीत आरोपी पाल, पंखीरा कारागिर होते.

पोरिया यांच्या पेढीला सराफ बाजारातील एका नामांकित सराफी पेढीकडून ३३ मंगळसूत्र घडविण्याचे काम देण्यात आले होते. त्यांना सराफी पेढीकडून सोन्याची ण्देण्यात आली होती. दररोज रात्री काम झाल्यानंतर पोरिया सोन्याचे मोजमाप करायचे. कारागिरांना सराफी पेढीत राहण्याची व्यवस्था करून देण्यात आली होती. पाल आणि पंखीरा सराफी पेढीतील एका कप्प्यात ठेवलेले सोने घेऊन पसार झाले. पाल आणि पंखीरा पेढीतून पसार झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पाहणी केली.

# रासायनिक कारखान्यामध्ये अपघात; पाच कामगार जखमी

**बोईसर (सुचिता देशमुख) :** तारापूर औद्योगिक क्षेत्रातील एका रासायनिक कारखान्यामध्ये अपघात होऊन पाच कामगार जखमी झाल्याची घटना घडली आहे. जखमी कामगारांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्रमांक एन.९० वरील कॅलीक्स केमिकल या रासायनिक कारखान्यामध्ये



शुक्रवारी दुपारी १.४५ वाजेच्या सुमारास उत्पादन प्रक्रिया सुरू असताना ड्रायरचे तापमान अचानक वाढून त्याचा स्फोट झाल्याने आगीचा भडका उडाला. या अपघातात ड्रायरमधील रासायनिक पदार्थ शरीरावर पडून राजमनी मौर्य, पवन देसले, आदेश चौधरी, निशिकांत चौधरी आणि संतोष हिंडलेकर हे पाच कामगार गंभीररीत्या भाजले आहेत. रासायनिक पदार्थ अंगावर पडल्याने कामगारांचा चेहरा आणि हात पाय भाजले असून त्यांना उपचारासाठी औद्योगिक क्षेत्रातील खाजगी रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले आहे.

# नाशिकमध्ये सरासरीच्या ९२.०४ टक्के पाऊस

**नाशिक (नितीन देवळेकर) -** एक जून ते १९ सप्टेंबर या कालावधीत जिल्ह्यात सरासरीच्या ८०० मिलिमीटर म्हणजेच ९२.०४ टक्के पाऊस झाला आहे. या काळात जिल्ह्यात सरासरी ८६६ मिलिमीटर पाऊस पडतो. १२ तालुक्यांत त्याने सरासरी ओलांडली, मात्र तीन तालुक्यात आणि त्यातील इगतपुरीत त्याचे प्रमाण लक्षणीय घटले. याचा परिणाम मुसळधार पाऊस होऊनही अद्याप सरासरी न गाठण्यात झाल्याचे दिसत आहे.



सध्या पावसाने उघडीप घेतली असून तो आता निरोप घेण्याच्या तयारीत आहे. यंदाच्या हंगामात जुलैअखेर आणि ऑगस्टमधील सलग काही दिवस पावसाने जोरदार हजेरी लावल्याने दुष्काळ, पाणी टंचाईचे सावट दूर सारले गेले. पिकांची स्थिती चांगली असल्याने जिल्ह्यात शेतकऱ्यांमध्ये समाधान आहे. सद्यस्थिती पाहता जिल्हा या वर्षी पावसाची सरासरी गाठेल की नाही, याबद्दल उत्सुकता आहे.

प्रशासनाच्या माहितीनुसार एक जून ते १९ सप्टेंबर या कालावधीत जिल्ह्यात सरासरी ८६६. ५ मिलिमीटर पाऊस होतो. यंदा त्यात घट होऊन तो ९२.४ टक्केच झाला आहे. जिल्ह्यात १२ तालुके खऱ्या अर्थाने जलसमृद्ध झाले. दुष्काळी, कमी पावसाच्या भागात पावसाने दमदार हजेरी लावली. मालेगाव तालुक्यात आतापर्यंत ५०८ मिलिमीटर (१२२.९ टक्के), बागलाण ६०१ (१३८), कळवण ६७४ (११५.६), नांदगाव ५७३ (१३०.४), सुरगाणा १९०७ (१०६.९), दिंडोरी ९४४ मिलिमीटर (१५१.२), निफाड ४४८ (१०९.२), सिन्नर ५०३ (१०८.१ टक्के), येवला ४८३ (११९.३), चांदवड ६४३ (१३४.१), त्र्यंबकेश्वर २१२७ मिलिमीटर (१०३.१) आणि देवळा तालुक्यात ५६२ (१४९.१ टक्के) पावसाची नोंद झाली आहे.

इगतपुरीत १२०० मिलिमीटर घट बहुतांश भागात दमदार पाऊस होऊनही पावसाने सरासरी न गाठण्यामागे इगतपुरी, पेठ आणि नाशिकमध्ये घटलेला पाऊस हे कारण असल्याचे लक्षात येते. इगतपुरीत आतापर्यंत सरासरी २९०३ मिलिमीटर पाऊस पडतो.

# games, zero defeats as Iran become latest team to be humbled

By the time the end was near, Gukesh had taken to prowling around his seat like he was circling a hapless prey. Iran's Parham Maghsoodloo, Gukesh's crestfallen opponent, was left clutching his forehead with both palms like a man who had gambled away his life's savings guided by a hunch. When he resigned at last, the Iranian could not even bear looking Gukesh in the eyes.

After 25 moves in the book on the top board of the India versus Iran game in the 8th round of the Chess Olympiad, Parham had held a 10-minute advantage on the clock and had two additional pawns on the board compared to 18-year-old Gukesh, the boy who had pipped him to secure a spot at the Candidates chess tournament late last year.



Iran's Parham Maghsoodloo greets India's Gukesh ahead of their clash on Thursday. FIDE via Michal WaluszaIran's Parham Maghsoodloo greets India's Gukesh ahead of their clash on Thursday. FIDE via Michal Walusza

But over the course of four moves, where he erred thrice, Maghsoodloo had managed to cause irreversible damage to his chances of beating Gukesh. The first mistake was gifting his only remaining knight away for free on move 29, the second mistake was taking Gukesh's knight off the board when he could have chosen to chop the head of Gukesh's queen (which would have also cost him his own queen) on move 31 and the final mistake was dropping his rook to the b2 square rather than moving his king to a safer square on move 32.

Over on the other boards, Maghsoodloo's teammates were having equally wretched luck as him.Bardiya Daneshvar, playing with white pieces, also resigned after 36 moves as Arjun sent a bulldozer of a rook, protected by a pawn which was threatening to promote, to clean up house on the back rank.

Vidit Gujrathi, playing on the fourth board, also arm-twisted Idani Pouya into resigning after 40 moves.


# This 'T' shaped flyover is set to solve traffic mess at Mumbai's Mith Chowky junction



**MUMBAI -** One of the most congested traffic junctions in the western suburbs of Mumbai is set to become clutter free this year.

The Brihanmumbai Municipal Corporation (BMC) has constructed a 'T' shaped vehicular flyover to decongest the Mith Chowky junction, also known as the Uncle's Kitchen junction in Malad (West). The Mith Chowky is a four-arm traffic junction where the S V Road intersects the road going towards Madh Island. This junction is a primary connecting point in the western suburbs of Mumbai as all vehicles travelling towards Andheri and Bandra from Borivali, Dahisar, and Mumbai Metropolitan Region (MMR) pass through this road. Due to the heavy influx of vehicles, the junction has become a bottleneck and it takes 10-15 minutes to pass the 50-metre stretch during the peak hours. Therefore, once this flyover is built, vehicles will be able to pass over the junction smoothly. Mith Chowky This bridge will only cater to light motor vehicles, since there will be a restriction in height as the elevated Metro 2-A line intersects horizontally above the proposed bridge. The 800-metre-long flyover will be 'T-shaped' with its eastern arm originating from Girdhar Park Bridge that passes above Malad Creek and extends above the traffic junction.

# Pune's 58 scientists in the top 2% in the world




Fifty-eight scientists from Pune feature in this year's Stanford University rankings list of top 2% of scientists in the world. These include 14 from Savitribai Phule Pune University (SPPU), 11 from Symbiosis International University (SIU), 12 from National Chemical Laboratory (NCL), 9 from Inter-University Centre for Astronomy and Astrophysics (IUCAA), 4 from Indian Institute for Science Education and Research (IISER) Pune, 4 from DY Patil Vidyapeeth, 1 from Pulmocare Research and Education (PURE) Foundation, 1 from KEM Hospital, 1 from Armed Forces Medical College and 1 from College of Engineering Pune (COEP).

On September 17, Stanford University released the list that includes 22 scientific fields and 174 sub-fields. The Stanford University ranking identifies the world's top scientists based on standardised citation metrics offering a reflection of the most influential researchers globally. Out of the 2,23,252 scientists in the top 2% in the world from across all fields, India has 5,352, up from 4,635 in 2023.

When contacted, Dr Ramakrishnan Raman, Vice-Chancellor, Symbiosis International (Deemed) University said the prestigious achievement underscores the varsity's commitment to foster excellence in research and interdisciplinary innovation. "As the Vice-Chancellor, I am immensely proud of the recognition that 11 faculty members are in the global top 2 percent scientist rankings. We are also supported by dedicated faculty members who strive for academic excellence," Dr Raman told The Indian Express. Dr Vidya Yeravdekar, Pro-VC, SIU said this achievement showcases the exceptional work being done by the institution towards impactful research.

# कामठी रेल्वे स्थानकाबाहेर हावडा एक्सप्रेसवर दगडफेक

**नागपूर (नितीन देवळेकर) :** अलिकडे देशात विविध ठिकाणी रेल्वेगाड्यांवर दगडफेकीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडताना दिसत आहेत. वंदे भारत एक्सप्रेस सारख्या प्रिमियम गाडीवरही दगडफेक झाली होती. शुक्रवारी नागपूरजवळील कामठी रेल्वे स्थानकाबाहेर हावडा एक्सप्रेसवर दगडफेक झाली. नागपूर-बिलासपूर वंदे भारत एक्सप्रेसवर देखील दगडफेक झाली होती. कामठी परिसरात ही घटना घडली होती. त्यावेळी रेल्वे सुरक्षा दल आणि लोहमार्ग पोलिसांनी तपास केल्या असता काही किशोरवयीन मुलांनी गाडीवर दगडफेकल्याचे दिसून आले. त्या मुलांनी खेळताना गाडीवर दगड फेकले होते. त्यांच्या पालकांना या घटनेचे गांभीर्य सांगून प्रकरण मिटवण्यात आले होत. शुक्रवारी अहमदाबादहून कामठी स्थानकावर येत



असलेल्या अहमदाबाद-हावडा एक्सप्रेसवर दगडफेक करण्यात आली. ही गाडी कामठी स्थानकाजवळ असताना काहींनी दगड भिरकावले.

अचानक दगड आल्याने नेकमे काय होत आहे हे प्रवाशांना समजले नाही. याबाबत काही प्रवाशांनी तक्रार केली. रेल्वे स्थानक काही अंतरावर असताना गाडी थांबवण्यात आली. याठिकाणी सुमारे १५ मिनिटे गाडी उभी होती. दगडफेकीमुळे कोणालाही दुखापत झाली नाही. तसेच गाडीचेही नुकसान झाले नाही. सर्व काही ठीक असल्याची खात्री पटल्यानंतर ही गाडी पुढील प्रवासाला निघाली. रेल्वे सुरक्षा दल आणि लोहमार्ग पोलिसांनी घटनास्थळ गाठले. परंतु दगडफेक करणारे पसार झाले होते. अहमदाबा-हावडा एक्सप्रेसवर कामठी स्थानकनजिक दगडफेक झाल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर रेल्वे सुरक्षा दलाने घटनास्थळाची पाहणी केली. सुरक्षा दलास दगडफेकीची घटना घडल्याचे आढळून आले नाही. शेजारच्या रुळांवरून धावणाऱ्या गाडीमुळे रुळाखालील गिट्टीचा तुकडा उघडण्याची शक्यता आहे, असे दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वे प्रशासनाने म्हटले आहे.

## अहमदाबाद एक्सप्रेवरही दगडफेक

बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा रेल्वे स्थानकावर हावाडा -अहमदाबाद एक्सप्रेसवर दगडफेक झाली होती. त्याची चित्रफित समाज माध्यमांवर व्हायरल झाली होती. या दगडफेकीत रेल्वेचे मोठे नुकसान झाले आहे. नांदुरा रेल्वे स्थानकावर दहा ते पंधरा जणांनी रेल्वेच्या एसी बोगीवर ही दगडफेक केली होती. काही प्रवाशी पेंट्री कारमध्ये जाऊन बसण्याचा प्रयत्न करत असल्याने काही कर्मचाऱ्यांनी त्यांना अडवले. त्यामुळे दगडफेक झाल्याचे सांगण्यात येत होते.

## बड्या उद्योगासाठी 'एमआयडीसी'कडून भूसंपादन? वाढवण बंदराजवळील १२०० एकर जमिनीची वस्त्रोद्योग केंद्रासाठी निवड



● पालघर, (सतीश सोनावणे) :

वाढवण बंदरामुळे जगाच्या नकाशावर येऊ घातलेल्या पालघर जिल्ह्यातील माहीम आणि टोकराळे परिसरातील सुमारे १२०० एकर शासकीय जागेवर वस्त्रोद्योग केंद्र (टेक्स्टाइल पार्क) उभारण्याच्या हालचाली सुरू आहेत. यासाठी महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाकडून भूसंपादन करण्यात येत असले तरी प्रत्यक्षात तो प्रकल्प खासगी उद्योग समूह राबवणार असल्याचे समजते. वाढवण बंदराच्या उभारणीनंतर निर्यातीच्या दृष्टीने सोयीस्कर ठरेल, असे केंद्र विकसित करण्यासाठी हा उद्योग समूह उत्सुक असल्याचे समजते.

## ठाण्यासह दिवा, कळवा, मुंब्र्यात शुक्रवारी पाणी नाही

● ठाणे, (रोहित जैसवार) :

ठाणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून जलवाहीनी दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामामुळे ठाणे शहरातील काही भागांसह दिवा, कळवा, मुंब्रा भागाचा पाणीपुरवठा आज, शुकवारी चोवीस तास बंद राहणार आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात चार स्त्रोतांमार्फत दररोज ५८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यापैकी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १३५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. या पाण्याचा पुरवठा मुंब्रा, दिवा, कळवा, माजिवडा- मानपाडा आणि वागळे इस्टेटमधील काही भागात केला जातो. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेच्या अंतर्गत बारवी गुरूत्व वाहिनीचे कटाई नाका ते शीळ टाकी येथे तातडीचे दुरूस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे.

# कोल्हापुरातील तिन्ही अपक्ष आमदारांनी महायुतीची डोकेदुखी वाढवली

● कोल्हापूर, (दिगंबर जाधव) :

**आधीच कोल्हापूर जिल्ह्यातील महायुतीच्या चौघा बड्या नेत्यांनी महाविकास आघाडीचा रस्ता पकडला असताना आता महायुतीशी संलग्न जिल्ह्यातील तिन्ही आमदारांनी स्वत:ची ताकद दाखवायला सुरुवात केल्याने महायुतीची डोकेदुखी वाढली आहे.**


जनसुराज्य शक्ती पक्षाचे विनय कोरे, ताराराणी पक्षाचे प्रकाश आवाडे आणि नव्याने स्थापन झालेल्या राजर्षी शाहू आघाडीचे राजेंद्र पाटील यड्रावकर या तिन्ही साखर सम्राट माजी मंत्र्यांनी विधानसभा स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केली असल्याने हा गुंता सोडवणे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समोरचे कडवे आव्हान असणार आहे.



कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या विधानसभा निवडणुकीत तिघांनी अपक्ष म्हणून लढून यश मिळवले. त्यापैकी विनय कोरे यांनी आपल्या जनसुराज्य शक्ती पक्षाच्या माध्यमातून झेंडा रोवला. जनसुराज्य पक्ष हा भाजपला पाठिंबा दिलेला सहयोगी पक्ष आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी कोरे यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. त्यांनी भाजपकडे १५ जागांची मागणी केली आहे. कोल्हापुरात त्यांचा स्वतःचा पन्हाळा, शेजारचा हातकणंगले राखीव , करवीर या मतदारसंघावर त्यांनी दावा केला आहे. शिरोळचे भाजपचे अशोक माने हे गेल्यावेळी जनसुराज्य कडून लढले होते. यावेळी कोरे त्यांना पुन्हा संधी देतील अशी शक्यता आहे. करवीर मध्ये सध्या शिंदे छावणीत असलेले माजी आमदार चंद्रदीप नरके यांनी दोनदा विजय मिळवला होता. येथे कोरे यांनी आता संताजी घोरपडे या उद्या चेहऱ्याला रिंगणात उतरवण्याची तयारी केल्याने युतीत तणाव आहे. इचलकरंजी मध्ये महायुतीचे गणित नीट जुळत नसेल तर अजित पवार राष्ट्रवादी मध्ये असलेले इचलकरंजी महानगर जिल्हाध्यक्ष विठ्ठल चोपडे हा नवा चेहरा जनसुराज्यकडून असू शकतो. त्यामुळे कोरे यांच्या वाढलेल्या अपेक्षांची पूर्तता करणे हे भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्या समोरचे आव्हान असणार आहे.

इचलकरंजीत प्रकाश आवाडे यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केला असला तरी त्यांची प्रत्यक्ष यादी संपत नाही. या प्रकाराला कंटाळून आता या वेळच्या निवडणुकीत त्यांनी पुत्र राहुल आवाडे यांना आखाड्यात उतरवण्याची तयारी केली आहे. याच वेळी हातकणंगलेमध्ये जयश्री कुरणे यांची उमेदवारी जाहीर करून दबाव वाढवला आहे. शिरोळ मध्ये आमदार राजेंद्र पाटील यांची भूमिका काय ठरते आणि महायुतीचा निर्णय काय होतो हे पाहून येथे आवाडे आपला उमेदवार जाहीर करतील असे दिसत आहे. यामुळे इचलकरंजी येथेही देवेंद्र फडणवीस यांना लक्ष घालून महायुतीत टोकदार तणाव निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल असे चित्र आहे. शिरोळ तालुक्यात अनपेक्षित राजकीय घडामोडी घडत आहेत. राष्ट्रवादीच्या छावणीतून ठाकरे सेने कडे आणि तेथून शिंदे सेनेकडे आलेले राजेंद्र पाटील यांच्यासमोर कोणता झेंडा घेऊ हाती असा पेच निर्माण झाला आहे. लोकसभा निवडणुकीला राज्यात महाविकास आघाडीला यश मिळाले असल्याने त्यांची मनस्थिती द्विधा झाली आहे . शिरोळ मध्ये दलित, मुस्लिम हा वर्ग मोठा आहे.

## उपवनच्या खाडीत आढळला मानसिक रुग्णाचा मृतदेह



● ठाणे, (सूचित शिंदे) :

ठाण्याच्या वर्तकनगर भागातील उपवन तलावामध्ये एका ४० ते ४५ वर्षीय मानसिक रुग्णाचा मृतदेह गुरुवारी सकाळी पावणेआठच्या सुमारास आढळला. त्याने आत्महत्या केली की, पोहतांना बुडाला, याचा तपास करण्यात येत असल्याची माहिती वर्तकनगर पोलिसांनी दिली.

उपवन तलावामध्ये गणपती मंदिराजवळ एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह मिळाल्याची माहिती ठाणे अग्शिशमन विभागाला मिळाली. त्याच आधारे घटनास्थळी वर्तकनगर पोलिस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी तसेच अग्निशमन दलाचे जवान हे आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या विभागासह दाखल झाले.

## सीबीडी पोलीस ठाण्यात अभ्यासिका

● नवी मुंबई, (धनश्री सट्टा) :

कुठल्याही पोलीस ठाण्यात गेल्यावर त्या पोलीस ठाण्याचे बहुतांश आवार हे गुन्ह्यातील जप्त वाहने, अपघाती वाहने आणि संशयित वाहनांनी भरून गेलेले असते. मात्र नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात अशा वाहनांसाठी वेगळी जागा करण्यात आली आहे. त्यामुळे आता पोलीस ठाणे आवार सुटसुटीत झाले आहेत. या जागेचा कल्पक उपयोग सीबीडी पोलीस ठाण्याने केला असून काही महिन्यांपूर्वी बॅडमिंटन कोर्ट उभे केले. तर आता पोलिसांसाठी अभ्यासिका निर्माण करण्यात आली आहे. त्याचे उद्घाटन नुकतेच पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते पार



पडले. नवी मुंबई पोलीस आयुक्त यांनी गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल व वाहने हे आयुक्त स्तरावर केंद्रित केल्यानंतर नवी मुंबई आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यामधील बरीच जागा रिकामी झाली. तसेच मुद्देमाल ठेवलेल्या काही खोल्याही रिकाम्या झाल्या होत्या. सीबीडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांनी सदर जागेचा उपयोग आपले सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बॅडमिंटन कोर्ट, ओपन जिम असे उपक्रम सुरू करण्यासाठई केला होता.

## गुरुकृपा कॉलेजमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

● कल्याण, (आकाश कांबळे) :

कल्याण मधील गुरुकृपा कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च याठिकाणी आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील एक हजार महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजनेचा शुभारंभ आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वर्धा येथे पार पडला. या प्रशिक्षण केंद्रामध्ये महाराष्ट्र मधील एकूण 58 महाविद्यालयात कल्याण मधील गुरुकृपा महाविद्यालय देखील सहभागी आहे. या कार्यक्रमास नायब तहसीलदार सत्यजित चव्हाण, तलाठी प्रशांत चौगुले, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे ॲकेडेमिक डायरेक्टर डॉ. लगशेट्टी व्ही. एस. उपस्थित होते. या उपक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा ललिता वीर, सचिव पंकज वीर व इतर पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या व कौतुक केले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्या डॉ. विदयुल्लता कोल्हे व गुरुकृपा महाविद्यालयाच्या सर्व कर्मचारी वर्ग यांनी उत्तमरित्या केले.

## वीज देयकात खाडाखोड करून ४६२ ई- मतदार नोंदणी अर्ज, 'सतीश सर' नामक व्यक्तीवर गुन्हा

● कराड, (सचिन कदम) :

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात मतदार नोंदणीच्या ऑनलाइन प्रक्रियेत नमुना आठ या अर्जाद्वारे स्थलांतर दाखवून वीज देयकात खाडाखोड करीत एकाच नावाने तब्बल ४६२ ऑनलाइन अर्ज दाखल झाल्याचा खळबळजनक प्रकार उघड झाला आहे. ऑनलाइन प्रणाली वापरकर्ता 'सतीश सर' नामक व्यक्तीवर शासनाच्यावतीने निवडणूक शाखेने शहर पोलिसात गुन्हा नोंद केला आहे.

कराड तहसील कार्यालयातील



निवडणूक शाखेच्या माहितीनुसार, कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात मतदार यादी शुद्धीकरण कार्यक्रमांतर्गत निरंतर प्रक्रियेमध्ये ५ ते १३ सप्टेंबर या कालावधीत सतीश सर या ऑनलाइन प्रणाली वापरकर्त्याने एकाच नावाने हजारमाची (ता. कराड) येथील व्यक्तीच्या २० देयकांत खाडाखोड करून, स्थलांतरितांसाठी नमुना नंबर आठचे ४६२ ऑनलाईन अर्ज दाखल केले.

निवडणूक आयोगाने ३० ऑगस्ट रोजी एक जुलै या अर्हता दिनांकावर आधारित जाहीर केलेल्या विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण कार्यक्रमांतर्गत अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली. या प्रसिद्धीनंतर निरंतर मतदार नोंदणीअंतर्गत नाव नोंदणी, दुरुस्ती, वगळणी व स्थलांतरित अर्ज दाखल करण्याची सुविधा निवडणूक आयोगाच्या पोर्टल आणि संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली. मात्र, या सुविधेचा गैरवापर करीत नमुना आठ अर्जाद्वारे सतीश सर नामक

## हिंजवडी, शैक्षणिक संस्थांच्या परिसरात गांजा विक्री करणारे गजाआड



● पिंपरी-चिंचवड, (शकिल शेख) :

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये गांजा विक्री करणाऱ्या तिघांना अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. आरोपींकडून १८ लाख रुपयांचा ३३ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. आरोपी हे धुळे येथून गांजा तस्करी करून पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागात विक्री करत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. याप्रकरणी सुरेंद्रकुमार संतोष त्रिपाठी, अशोक गुलाबचंद पावरा आणि पवन सानू पावरा या तिघांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागांत, आयटी हब हिंजवडी आणि शैक्षणिक संस्था असलेल्या ठिकाणी आरोपी हे गांजा विक्री करत होते. याबाबतची माहिती अमली पदार्थ पथकाच्या पोलीस कर्मचाऱ्याला मिळाली. साहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड हे त्यांच्या पथकासह हिंजवडी आणि म्हाळुंगे परिसरात गस्त घालत असताना काही व्यक्ती संशयितरित्या फिरत असल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे विचारपूस करण्यात आली. आधी १६ किलो तर पोलिसी खाक्या दाखवताच १७ किलो गांजा आरोपींकडून जप्त करण्यात आला.

## जगातील कोणत्या देशात सर्वाधिक तास काम करावं लागतं?

● नवी दिल्ली, (प्रगती शर्मा) :

आपल्याकडे साधारण ९ ते ५ ही ऑफिसची वेळ असते. मात्र, काम इतकं असतं की अनेकदा अतिरिक्त वेळ थांबून काम करावं लागतं. अर्थात, ही परिस्थिती आपल्याच देशात आहे असं नाही, तर जगात इतर अनेक देश आहेत, ज्या देशातील नागरिक अतिरिक्त वेळ थांबून काम करतात. दरम्यान, यासंदर्भात नुकतीच आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने एक आकडेवारी जाहीर केली आहे, ज्यात त्यांनी भारतासह इतर देशातील नागरिक आठवड्याला सरासरी किती तास काम करतात, यासंदर्भात माहिती दिली आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानुसार सर्वाधिक तास काम करणाऱ्या नागरिकांच्या पहिल्या १० देशांच्या यादीत भूतान हा पहिल्या क्रमांकावर आहे. भूताननंतर भारताचा दुसरा, तर बांगलादेशचा तिसरा क्रमांक लागतो. याशिवाय भारताचा शेजारी असलेला पाकिस्तान सातव्या क्रमांकावर आहे.



भूतानमधील ६१ टक्के नागरिक प्रत्येक आठड्याला सरासरी ४९ तासांपेक्षा जास्त काम करतात, तर भारतातील नागरिक दर आठवड्याला सरासरी ४६.७ तास काम करतात. तसेच भारतातील ५१ टक्के नागरिक असेही आहेत, जे आठवड्याला ४९ तास किंवा त्यापेक्षा जास्त काम करतात. याशिवाय बांगलादेशातील ४७ टक्के नागरिक ४९ किंवा त्यापेक्षा जास्त तास काम करतात, तर पाकिस्तानातील ४० टक्के नागरिक ४९ किंवा त्यापेक्षा जास्त तास काम करतात. महत्त्वाचे म्हणजे आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या या यादीतील पहिल्या १० देशांमध्ये दक्षिण आशियातील देश आहेत. यावरून या देशातील नागरिक अतिरिक्त वेळ थांबून काम करत असल्याचे स्पष्ट होत आहे. याशिवाय ???अरुबातील??? नागरिक सरासरी ३९.४ तास काम करतात. तर चीनमधील नागरिक ४६.१ तास, क्रोएशियातील नागरिक ३७.९ तास, जॉर्जियातील नागरिक ४०.५ तास, जर्मनीतील नागरिक ३४.२ तास, आयल ऑफ मॅनमधील नागरिक ३५ तास, जपानमधील नागरिक ३६.०६ तास, न्यू जर्सीतील नागरिक ४० तास आणि सिंगापूरमधील नागरिक सरासरी ४२.६ तास काम करत असल्याचे या अहवालात म्हटलं आहे.

## "२२० वर्ष जुनी एशियाटिक सोसायटी ताब्यात घ्या"

**कर्मचाऱ्यांची मोदी सरकारकडे मागणी!**

● मुंबई, (विशाल कारंडे ) :

मुंबई : दक्षिण मुंबईतील हॉर्निमन सर्कल परिसरात दोन शतकांहून अधिक काळ दिमाखात उभ्या असलेल्या ऐतिहासिक एशियाटिक सोसायटीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. व्यवस्थापकीय समितीचा



उदासीन कारभार आणि अपुऱ्या निधीमुळे सोसायटी डबघाईला आली असून केंद्र आणि राज्य सरकारने वेळीच लक्ष घालून संस्था ताब्यात घ्यावी, अशी मागणी एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष कॉ. प्रकाश रेड्डी यांनी केली आहे.ऐतिहासिक वारसा असलेल्या या संस्थेची दुरावस्था आणि कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान याविषयी गुरुवारी पत्रकार परिषदेत कर्मचाऱ्यांनी माहिती दिली. एशियाटिक सोसायटीला 'राष्ट्रीय महत्त्वाची संस्था' हा दर्जा मिळायला हवा होता, मात्र त्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात संस्थेची व्यवस्थापकीय समिती अपयशी ठरली आहे. व्यवस्थापकीय समितीची अकार्यक्षमता आणि पुरेशा निधीअभावी एशियाटिक सोसायटीतील ग्रंथालय आणि

## लोकसभेतील यशानंतर काँग्रेस विधानसभेला एकटी लढणार?

● मुंबई, (राकेश गायकवाड) :

लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे. त्यानंतर महाराष्ट्रातील काँग्रेसच्या नेत्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. परिणामी महाविकास आघाडीत विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या जागावाटपात काँग्रेसने अधिक जागांची मागणी केली असल्याचं बोललं जात आहे. तसेच काही काँग्रेस नेते मुख्यमंत्रीपद



काँग्रेसला मिळावं अशी इच्छा व्यक्त करत आहेत. या सर्व घटना पाहता काँग्रेसचा आत्मविश्वास वाढला आहे, असं म्हटलं जात आहे. यावरून प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांना प्रश्न विचारला. त्यावर संजय राऊत म्हणाले, "केवळ काँग्रेसचाच नव्हे तर संपूर्ण महाविकास आघाडीचाच आत्मविश्वास वाढलेला आहे".

### संजय राऊत नेमकं काय म्हणाले?

ठाकरे गटाचे खासदार म्हणाले, तिन्ही पक्ष मिळून एकत्रितपणे विधानसभा निवडणूक लढणार आहोत. लोकसभा निवडणुकीचं जागावाटप खूप सोपं होतं. कारण तेव्हा फक्त ४८ जागांचा विचार आम्ही करत होतो. परंतु, आता विधानसभा निवडणुकीला आम्हाला २८८ जागांचं वाटप करायचं आहे. महाविकास आघाडीत तीन प्रमुख पक्ष आहेत. तसेच आमचे लहान मित्रपक्ष देखील आहेत. त्या सगळ्यांना सामावून घेण्याची आमची भूमिका आहे. महाविकास आघाडीचे प्रमुख नेते शरद पवार (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख), शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे आमच्या मित्रपक्षांना देखील महाविकास आघाडीत सामावून घेण्यासाठी प्रयत्न करणार आहेत आणि आम्ही त्यात नक्कीच यशस्वी होऊ.